रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक २९९ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## तटकरेंची बोलती बंद

**पेण :** हमरापूर विभागामध्ये सुनील तटकरे यांनी युतीधर्म न पाळता बोलघेवड्या कार्यकर्त्यांच्या सांगण्यावरून हट्टाने भाजपच्या दोन्ही पाटलांना डावलून सभा घेतली. कार्यकर्ते न जमल्याने पूर्ण सभेचा फियास्को झाला. परंतु, हमरापूर विभागातील जागरूक मतदारांनी तटकरेंवर प्रश्नांचा भडीमार करून बोलतीच बंद केली. गेल्या पाच वर्षात हमरापूर विभाग आपल्याला का आठवला नाही. हमरापूर हा कोकण रेल्वेचा थांबा असून, देखील एकही लांब पल्ल्याची गाडी थांबत नाही? आपले चिरंजीव आमदार अनिकेत पान २ वर


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ५ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹


## नवनीत राणांचे जात प्रमाणपत्र वैध

**अमरावती :** अमरावतीच्या विद्यमान खासदार आणि भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी बनावट जात प्रमाणपत्र दिल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी उच्च न्यायालयाने त्यांच्या विरोधात निकाल दिला होता. या निर्णयाला नवनीत राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वीच त्यांना दिलासा मिळाला आहे.






आजचा अग्रलेख
**संशय फिटलाच पाहिजे**

# अवकाळीचं संकट

## ६ ते ९ एप्रिल दरम्यान पावसाची शक्यता | भारतीय हवामान विभागाने वर्तविला अंदाज

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यात तापमानाचा आलेख वाढत चालला आहे. विदर्भात सूर्य अक्षरश: आग ओकत आहे. तापमानाचा पारा आता ४२ अंश सेल्सिअसच्याही पलीकडे गेला आहे. तर या उन्हाळ्यात तो सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आता पुन्हा एकदा भारतीय हवामान खात्याने राज्यात सहा एप्रिलपासून अवकाळीचे संकट घोंगावत असल्याची वर्दी दिली आहे. पाच एप्रिलपासूनच राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. यामुळे उकाड्यापासून दिलासा मिळण्याऐवजी त्यात वाढ होण्याचीच दाट शक्यता आहे.



भारतात यावर्षी एप्रिल ते जून या कालावधीत उन्हाचा कडाका सरासरीपेक्षा अधिक राहील, असा इशारा भारतीय हवामान खात्यानेच दिला होता. महाराष्ट्रात त्याची प्रचिती येत असून तापमानात वेगाने वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भात होत असून बुधवारी ते ४२ अंश सेल्सिअसच्याही पलीकडे पोहोचले. त्यातच आता खात्याने नवा अंदाज जाहीर केला आहे. तो उन्हाचा नसून अवकाळी पावसाचा आहे. पान २ वर

### रायगडला धोका नाही

**राज्यात काही भागांमध्ये अवकाळी पाऊस पडणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. या अवकाळी पावसाचा धोका निर्माण होण्याची भिती रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना निर्माण झाली आहे. मात्र रायगड जिल्ह्यात पाऊस पडणार नसल्याचे रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले आहे . त्यामुळे अवकाळीचा धोका रायगड जिल्ह्याला नसल्याचे चित्र आहे.**

### जिल्ह्याचा पारा चढलेलाच

**रायगड जिल्ह्यामध्ये तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत उन्हाचे चटके बसत असल्याने अनेकजण उन्हात जाण्यास टाळत आहेत. काही जण उन्हापासून बचाव करण्यासाठी मफलर, थंडपेयाचा आधार घेत आहेत. जिल्ह्यात गुरुवारी कमाल ३३ अंश सेल्सिअस व किमान तापमान २९ अंश सेल्सिअस इतके होते. मात्र शुक्रवार, शनिवार या दोन दिवसात तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. ३६ ते ३७ अंश सेल्सिअस इतके तापमान वाढणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे.**

## राहुल पाटीलच्या जामीन अर्जावर ६ एप्रिलला सुनावणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

मथूर बैलाचे मालक राहुल पाटील हे जवळपास दोन आठवड्यापासून कल्याण येथील आधारवाडी जेलमध्ये आहेत. त्यांच्यावर पनवेल शहर पलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. चार एप्रिल रोजी पनवेलच्या न्यायालयात त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली न्यायालयाने दोन दिवसाची तारीख दिली असून आता या जामीन अर्जावर सहा एप्रिल रोजी सुनावणी होणार आहे. राहुल पाटील शर्यतप्रेमी राहुल पाटील यांची जामीनवार सुटका होण्याची वाट पाहत आहेत.



१२ मार्च रोजी ओवळे येथे बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात आली होती. यावेळी राहुल पाटील याच्या मथुर बैलाला पराभवाचा सामना करावा लागला. यावेळी अश्लील हावभाव, दगडफेक आणि गोळीबार केल्याप्रकरणी राहुल पाटील आणि अन्य १५ ते २० जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी राहुल पाटीलला १५ मार्च रोजी अटक केली. त्यानंतर काहीच दिवसांनी आशिष चव्हाण, मुकेश चित्ते, दिनेश यादव या त्याच्या ३ साथीदारांना देखील अटक करण्यात आली. एका साथीदाराकडून बंदूक जप्त करण्यात आली. न्यायालयाने राहुल पाटीलला काही दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. त्यानंतर २० मार्चपासून राहुल पाटील आणि अन्य तिघांची रवानगी कल्याणच्या आधारवाडी कारागृहात करण्यात आली. २२ मार्च रोजी राहुल पाटीलच्या जामीन अर्जावर पनवेल न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी पनवेल न्यायालयाने त्याचा जामीन पान २ वर

वे|ध|क

## शरद पवार गटाची दुसरी यादी जाहीर

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून लोकसभा निवडणुकीसाठी दुसरी उमेदवार यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये अत्यंत वादग्रस्त ठरलेल्या भिवंडी मधूनही उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. याठिकाणी सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या दुसऱ्या यादीमध्ये सात उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असून यामध्ये वर्धामधून अमर काळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दिंडोरीमधून भास्कर भगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बारामतीमधून सुप्रिया सुळे रिंगणात असतील, तर शिरूरमधून अमोल कोल्हे रिंगणात असतील. अहमदनगर दक्षिणमधून निलेश लंके रिंगणात असतील. दरम्यान, सर्वाधिक चर्चेच्या ठरलेल्या बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## तैवानमध्ये भूकंप

**नवी दिल्ली :** चीनच्या शेजारी असलेल्या तैवान देशात ७.७ तीव्रतेचा भीषण भूकंप झाला आहे. यामध्ये अनेक इमारती कोसळल्या आहेत. अधिक चिंतेचं कारण म्हणजे, तैवान, जपानचा ओकिनावा परिसर आणि फिलीपाईन्समध्ये त्सुनामीचा इशाराही देण्यात आला आहे. पूर्व तैवानमध्ये भूकंप आल्यानं तिथं इंटरनेट सेवादेखील बंद पडली आहे. तैवानमधला गेल्या २५ वर्षातला हा सर्वात भीषण भूकंप आहे. सप्टेंबर १९९९ मध्ये ७.६ तीव्रतेच्या भूकंपात २ हजार ४०० जणांचा मृत्यू झाला आहे.

## जहाजाला आग

**नवी दिल्ली :** थायलंडच्या आखातातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे गुरुवारी (दि.४) एका जहाजाला भीषण आग लागली. या भीषण आगीपासून बचाव करण्यासाठी घाबरलेल्या प्रवाशांनी थेट समुद्रात उड्या मारायला सुरूवात केली. पण या अपघातातून जहाजावरील सर्व १०८ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. हे जहाज सुरत थानी प्रांतातून थाई किनाऱ्यावरील लोकप्रिय पर्यटन स्थळ कोह ताओला जात होते.

# तटकरेंनी भान ठेवावे : गीते

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीत अनंत गीते यांना सहा वेळा निवडून देणाऱ्या समस्त मतदारांचा सुनील तटकरेंकडून अपमान करण्यात आला आहे. आगामी निवडणुकीत विरोधात बोलताना तटकरेंनी भान ठेवावे, असा इशारा अनंत गीते यांनी तटकरेंना दिला. अनंत गीते यांचे काम दाखवा आणि हजार रुपये मिळवा या तटकरेंच्या टीकेला गीतेंनी रोखठोक प्रत्युत्तर दिले आहे.



प्रचारसभेतून सुनील तटकरे यांनी अनंत गीते यांच्या कार्यक्षम तेवर प्रश्नचिन्ह उभे करीत अनंत गीते यांचे एक काम दाखवा आणि हजार रुपये मिळवा अशी घोषणा जाहीर सभेत केली होती. या टीकेला अनंत गीते यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अनंत गीते यांना जनतेने सहा वेळा निवडून दिले आहे. सुनील तटकरे यांना याचे भान नाही. ते लोकसभा निवडणूक लढवत आहेत. तटकरे हे माझ्या नाही तर जनतेचा, मतदारांचा अपमान करीत आहेत. भान ठेवा, असा हल्लाबोल अनंत गीते यांनी केला. यावेळी अनंत गीते यांनी अलिबागच्या नाम करण प्रश्नावर देखील भाष्य केले. अलिबाग शहराचे मायनाक नाम करण करण्यात यावे अशी मागणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. यावर गीते म्हणाले की नाव बदलणे, सुचविणे हा अधिकार सर्वांना. प्रत्येक नावामागे एक अस्मिता असते, मराठी माणूस आपल्या अस्मितेबद्दल कडवट असतो. अलिबागकर जनतेने निर्णय घ्यावा, असे गीते म्हणाले.

२०२४ ची निवडणूक विकासाच्या कोणत्या मुद्द्यांवर लढवली जाते या प्रश्नावर गीते म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदीच देशभर विकास शोधत पान २ वर

# अलिबागच्या नामांतराला विरोध

- **अलिबागमध्ये राहुल नार्वेकरांनी नाक खुपसू नये**
- **माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रघुजीराजे आंग्रे यांनी केला निषेध**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु असतानाच आता अलिबागच्या नामांतराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मात्र, अलिबागचे नाव मायनाक नगरी करण्याला अलिबागकरांनीच प्रखर विरोध केला आहे. समाजमाध्यमांवर नामांतराबाबत जोरदार मोहिम सुरु झाली आहे. अलिबाग नगरीचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे वशंज रघुजीराजे आंग्रे यांच्यासह अनेकांनी या मागणीला विरोध केला आहे. तसेच, विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी यामध्ये नाक खुपसू नये, असा इशारा देत त्यांच्या मागणीचा कडक शब्दात निषेध केला आहे.




अलिबागचे नाव बदलून ते मायनाक नगरी करावे, अशी मागणी करणारे पत्र अखिल भारतीय भंडारी महासंघाचे अध्यक्ष नवीनचंद्र बांदिवडेकर, मुख्य सचिव प्रकाश कांबळी, सहसचिव वैभव तारी आणि प्रवक्ते शशांक पाटकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिले होते. नार्वेकरांनी मागचा-पुढचा कोणताच विचार न करता थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून अलिबागचे नाव बदलून मायनाक नगरी करावे अशी मागणी केली आहे.

अलिबाग या नावाला इतिहास आहे. या भूमीत कान्होजी राजे आंग्रे यांचे फार मोलाचे योगदान आहे. येथील सर्व जाती-धर्माचे नागरिक एकोप्यानेराहतआलेआहेत.उगाचच कोणी वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करु नये, असे खडेबोल अलिबाग नगरीचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी सुनावले आहेत. काही वर्षापूर्वी स्वर्गीय ॲड.नमिता नाईक यांनी अलिबाग अस्मिता अभियान राबवले होते. याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली होती, याची आठवण देखील त्यांनी करुन दिली. तसेच मायनाक भंडारी यांच्या स्मारकासाठी सरकारने जागा उपलब्ध करून द्यावी. पान २ वर

# रिझर्व्ह बँकेची १० बँकांवर कारवाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय रिझर्व्ह बँकेने १० बँकांवर कडक कारवाई केली आहे. नियमांचे पालन न केल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने या बँकांना ६० लाख रुपयांपर्यंतचा दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमांचे पालन आणि ग्राहकांची सुरक्षितता याचे उल्लंघन केल्याने हा दंड लावण्यात आला आहे.ज्या बँकांवर कारवाई करण्यात आली आहे. त्या बँकांमध्ये पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र आणि हिमाचल प्रदेशातील बँकांचा समावेश आहे. या बँकांवर दंड आकारण्याबाबत आरबीआयने २६ आणि २७ मार्च रोजी निवेदन जारी




केले होते. आरबीआयने सोलापूर जनता सहकारी बँकेला २८.३० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. निर्देशांच्या काही तरतुदींचे पालन न केल्याबद्दल बँकेवर दंड ठोठावण्यात आला आहे. ३१ मार्च २०२२ पर्यंत बँकेच्या आर्थिक स्थितीची तपासणी आरबीआयने केली होती.

भारतीय रिझर्व्ह बँकेने जनलक्ष्मी पान २ वर

## कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये

# आचारसंहिता भंग झाल्याची तक्रार

- **पालिका मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध तक्रारींचे चौकशीचे आदेश**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

देशात लोकसभा निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी आदर्श आचारसंहिता जाहीर झाली आहे.त्यानंतर मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघ येथे खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि प्रशासक पंकज पाटील यांनी ई-निविदा जारी केली होती. त्याविरुद्ध कर्जत येथील वकील ऋषिकेश जोशी यांनी ऑनलाईन पद्धतीने एनजीएसपी पोर्टलवर तक्रार दाखल केली.त्या तक्रारीनंतर आचारसहिंता भंग झाल्याच्या तक्रारीची दखल घेऊन मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी चौकशी समिती गठीत केली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोग यांनी दिनांक १६ मार्च रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यानुसार ३३-मावळ लोकसभा मतदार संघासाठी दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी निवडणुकीची अधिसूचना जाहीर होणार असून दिनांक १३ मे २०२४ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहेत. तसेच मतमोजणीची प्रक्रिया ०४ जून २०२४ रोजी पार पाडली जाणार आहे. त्याअनुषंगाने ३३-मावळ लोकसभा मतदार संघांतर्गत १८९-कर्जत विधानसभा मतदार संघामध्ये निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आचार संहिता लागू झालेली आहे.३३-मावळ लोकसभा मतदार संघांतर्गत १८९-कर्जत विधानसभा मतदारसंघ अंतर्गत खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज पाटील यांना सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ चो आचारसंहिता घोषित झाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबविली. त्यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याबाबतची तक्रार पान २ वर

# शिंदेंचा पक्ष दोन-चार महिन्यांचा



**विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे भाकीत**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**


शिंदे गटाला भाजपाने जवळपास घेरलेले आहे. कृपाल तुमाने, हेमंत पाटील, भावना गवळी यांचे तिकीट कापण्यात आले आहे. हातकंणगलेमधून धैर्यशील माने यांना विरोध सुरू आहे. ठाणे आणि कल्याण सहजासहजी मिळत नाही. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मिळत नाही, रायगड मागण्याचा प्रयत्न केला. पण यात त्यांना यश मिळाले नाही. शिंदे गट आता दोन-चार महिन्यांचा पक्ष आहे. विधानसभेपर्यंत हा पक्ष राहिल, असे मला वाटत नाही, असे भाकीत विधान विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले.

भाजपाने शिंदे गट आणि अजित पवार गटाला ताटाखालचे मांजर बनवून ठेवले आहे. दोन्ही गटाच्या म्हणण्याला काही अर्थ नाही. जे भाजपा म्हणेल, तेच या लोकांना करावे लागेल. एखाद्या पक्षाचा उमेदवार दुसऱ्याच पक्षाने ठरवावा, असे पान २ वर

## भारतीय निवडणूक आयोगाने घेतली होती दखल

# २५ रुग्णांनी रुग्णवाहिकेतून केले होते मतदान

**रायगड : २०१९ साली झालेल्या रायगड लोकसभा निवडणुकीत एक महत्वाची घटना घडली होती. ती म्हणजे अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या २५ रुग्णांना मतदान करण्याची व्यवस्था तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली होती. आजारी असतानाही मतदान करता आल्याने रूग्ण देखील चांगलेच खुश होते. या घटनेची नोंद भारतीय निवडणूक आयोगाने हायलाइटस ऑफ २०१९ इलेक्शन या पुस्तकात घेतली होती.**






आविष्कार देसाई

निवडणुकीत मतदानापासून कोणीच वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोग, स्थानिक प्रशासन सातत्याने प्रयत्न करत असतात. देशाचे राष्ट्रपती अथवा प्रधानमंत्री यांना मतदानाचा हक्क दिला आहे. तोच अधिकार सर्वसामान्य जनतेला देशाच्या संविधानाने दिला आहे.

२०२४ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २०१९ लोकसभा निवडणुकीचे रायगड लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याबरोबर वार्तालाप करताना त्यांनी निवडणुकीतील अनेक किस्से सांगितले. त्यांच्या कार्यकाळातील मतदानाचा राबविलेला अनोखा प्रयोग त्यांनी विशद केला. २०१९ साली रायगड जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीची चांगलीच धामधूम सुरु होती. प्रमुख राजकीय पक्षांतील उमेदवारांच्या प्रचाराला चांगलीच रंगत आली होती. मतदानाची तारीख जशी जवळ येत होती, तशी केलेल्या तयारीचा आढावा सातत्याने घेण्यात प्रशासन व्यस्त होते. याच कालावधीत अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयात काही कामानिमित्त गेलो होता;. तेथे उपचार घेत असलेल्या रुग्णांची विचारपूस करताना माझ्या डोक्यात विचार आला की, या रुग्णांना मतदान करता येणार नाही. ते मतदानापासून वंचित राहू नये यासाठी काही तरी केले पाहिजे, असा विचार माझ्या मनात रुंजी घालत होता, असे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले.

काही रुग्णांना विचारले की, तुम्हाला निवडणुकीत मतदान करायचे आहे का, असे विचारले असता, ते म्हणाले साहेब, मतदान तर करायचे आहे, मात्र रुग्णालयात भरती असल्याने तो मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.

ज्या रुग्णांना चालता-फिरता येते, ज्यांना कमी त्रास होत असेल अशा रुग्णांना मतदानासाठी नेता येऊ शकते का, असे मी संबंधित जिल्हा शल्यचिकित्सकांना विचारले. त्यांनी देखील या संकल्पनेला दुजोरा दिला. त्यानंतर मतदानाच्या पान २ वर

# बोर्लीच्या सरपंचाचा मनमानी कारभार?

- **ग्रामपंचायत सदस्या सिध्दीता चुनेकर यांचा आरोप**
- **अपात्र ठरविण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मागणी**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

बोर्ली येथील ग्रामपंचायतीच्या सदस्यांना विश्वासात न घेता बोर्लीच्या शिंदे गटातील सरपंच आपल्या मर्जीने कारभार चालवत असल्याचा आरोप सदस्या सिध्दीता चुनेकर यांनी केला आहे. त्यामुळे सरपंच सपना जायपाटील यांच्या विरोधात चुनेकर यांनी आक्रमक भुमिका घेऊन सरपंच यांना अपात्र ठरविण्यात यावे अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी मंगळवारी निवेदन दिले आहे.

दिलेल्या निवेदनानुसार बोर्लीत कांदळवन समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमध्ये जाणीवपूर्वक बदल करून पदाचा गैरवापर करून अन्य व्यक्तींची नावे समितीमध्ये समाविष्ट केली आहेत. प्रतिज्ञापत्र घेऊन असेसमेंट उतारा व कर आकारणी करुन देण्याचा ठराव मंजूर असताना सुध्दा सरपंच यांनी नियम डावलून नोटरी घेऊन बाहेरील धनदांडग्यांना असेसमेंट उतारा दिला. मात्र स्थानिकांनी असेसमेंट उताऱ्यासाठी नोटरी लावून अर्ज केला असता, त्यांना प्रतिज्ञापत्र करण्यास सांगून त्यांची अडवणूक केल्याचा आरोप सिध्दीता चुनेकर यांनी केला आहे. तसेच मासिक सभेत आदिवासी समाजासाठी जातीचे दाखले व योजनांसाठी महत्वाचा विषय असतानादेखील या समाजातील प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांना सभेचा अजेंडा देण्यात आला नाही. त्यामुळे शासकीय योजनांपासून आदिवासी समाज वंचित राहण्यास सरपंच जबाबदार आहे. वेगवेगळी कामे मासिक सभेच्या इतिवृत्तात नसतानादेखील वेगवेगळी कामे स्वतःच्या मर्जीने पान २ वर

> **बोर्ली येथील सरपंच विरोधात आलेला तक्रार अर्ज बघून लवकरच त्याबाबत चौकशी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिला जाईल. त्यांच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.**
> **– डॉ. भरत बास्टेवाड**
> **मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ एप्रिल

१) श्री. सुरेश महादेव म्हात्रे
आवास, अलिबाग, ५-४-१९४९

२) श्री. सुमंगल कृष्णाजी परांजपे
अलिबाग, ५-४-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



हरिश्चंद्र गायकवाड, स्मृतिदिन, अलिबाग



कै. वासुदेव मल्लिकार्जुन बेत, स्मरणार्थ अलिबाग

# वनसंवर्धनाबरोबरच रोजगाराच्या संधी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**जंगलात राहणाऱ्या आदिवासींना तिथल्या एकेका ठिकाणाची इत्यंभूत माहिती असते. जंगल संवर्धनासाठी त्यांच्या माहितीचा वापर करून घेण्यासाठी वनविभागाने पुढाकार घेतला आहे. रायगड जिल्ह्यात सुधागड तालुक्यातून अभियानाची सुरुवात झाली असून ५७ गावांमधील १६ हजार ९६० एकर जमिनीचे सामुदायिक वनाचे अधिकार आदिवासींना देण्यात आले. या जमिनीवर वनीकरण, जलसंधारण, मृदसंवर्धन यासह उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध करून दिली जाणार असून प्रतिव्यक्ती पाच हजार रुपये रोजगार उपलब्ध होणार आहे. परिणामी आदिवासींचे स्थलांतर रोखता येईल.**



रायगड जिल्ह्यात फेब्रुवारी, मार्चमध्ये आदिवासी कुटुंबांचे स्थलांतर होते. कामधंदा शोधण्यासाठी ही कुटुंबे इतर जिल्ह्यात जात असतात. यासाठी या गावांचा तत्काळ वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. ५७ गावांमधील आदिवासींच्या गरजांनुसार या आराखड्यात बदल असणार असून हे आराखडे २०२४ अखेर पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु सुरु असलेल्या आचारसंहितेमुळे संबंधित विभागांचे अधिकारी दिरंगाई करीत असल्याचे दिसून येत आहेत, असे म्हणणे आदिवासींसाठी काम करणाऱ्या संघटनांचे आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, रोहा, माणगाव, अलिबाग या तालुक्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. दुर्गम भागात वास्तव्य करणारी ही आदिवासी कुटुंब पावसाळ्यानंतर कामानिमित्ताने स्थलांतरित होत असतात. वीटभट्टी, कोळसा खाणी या ठिकाणी वेठबिगार म्हणून ही कुटुंब काम करतात. बरेचदा यात त्यांची फसवणूक होत असते, ठरलेला मोबदला मिळत नाही. काम मात्र पूर्ण करून घेतले जाते. स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ होते. कुटुंबाची ओढाताण होत राहते. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या या लोकसमुदायांना परिणामी अन्याय, अपमान, दारिद्र्य, वंचित, अशिक्षित, कुपोषण यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. वर्षानुवर्षे हीच परिस्थिती कायम राहिली आहे. ही परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. सर्वच पातळीवर जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन अलिबाग वनविभागानेच आदिवासींचे स्थलांतरण रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आदिवासींनी त्यांच्याच गावात रोजगार उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न या माध्यमातून होत आहे.

**उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध होणार**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात ५७ गावांना वनहक्क कायद्याचे कलमांतर्गत सामूहिक वन हक्काचे अधिकार प्राप्त झाले आहेत. सामूहिक वनहक्क क्षेत्रातून आदिवासी लोकसमुदाय वनांचे संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन करण्याबरोबरच गौण वनउपज गोळा करून आपल्या गरजा भागवू शकतो. तसेच वनहक्क कायदा २००६ आणि महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी रोजगार हमी योजनेची सांगड घालून आदिवासी लोकसमुदायातील स्थलांतर थांबवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. याचाच एक भाग म्हणून सर्वप्रथम वनहक्क संवर्धन आराखडा मंजूर झालेल्या सुधागड तालुक्यातील चिवे येथील मजरे-जांभूळपाडा आदिवासी वाडीवर अलिबागचे उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी आदिवासींशी संवाद साधला आणि मार्च २०२४ अखेरपर्यंत १५० कुटुंबांना प्रती व्यक्ती पाच हजार रुपये प्रमाणे रोजगार उपलब्ध करून देण्याची ग्वाही पाटील यांनी दिली.

# रसायनीत रंगणार हरिनामाचा गजर

**रसायनी :** वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी, पाताळगंगा, खालापूर व पनवेल परिसर आयोजित ब्रम्हालिन हभप गुरूवर्य बाळाराम महाराज कांबेकर यांच्या कृपाशिर्वादाने रसायनीत मोहोपाडा येथे चैत्र शुध्द प्रतिपदा गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर दि. ९ एप्रिल २०२४ रोजी जनता विद्यालय मोहोपाड्याच्या भव्य मैदानावर श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचा गजर रंगणार असून या सप्ताह निमित्त परिसरातील मान्यवर महाराजांचे किर्तन व भजन मोहोपाड्याच्या मैदानावर रंगणार आहे.

हा कार्यक्रम सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत चालणार असून ९ एप्रिल २०२४ रोजी काकडा आरती तसेच काशिनाथ महाराज लबडे, कृष्णा जोडे, राम खाने, बळीराम दळवी, रघुनाथ भगत उपस्थित राहणार आहेत.


### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की आमचे अशिल, महाराष्ट्र राज्यातील तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील अलिबाग शहरामधील अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये स्थित आणि वसलेले सर्व्हे क्र./हिस्सा क्र. १०२७ मोजमापीत ४७३०.०० चौरस मिटर्स आणि सीटीएस क्र. १०२८ मोजमापीत ५१०८.७० चौरस मिटर्स सुसंगत सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८६/१ (जुना सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८६ए/१+२) मोजमापीत ९८.९७ गुंठा (७/१२ उतारानुसार) असलेली शेतजमिन तसेच या शेतजमिनीवर अलिबाग नगरपरिषदेच्या मुल्यांकन नोंदीनुसार मोजमापीत ५० चौरस मिटर्स बांधीव क्षेत्रफळ असलेली मालमत्ता क्रमांक १८१८ धारक संरचना, बंगला क्रमांक ४४, सोपानबाग हाऊसिंग सोसायटी, पुणे ४११००१ येथे राहणारे श्री संतोष कुमार (यापुढे **"सदर मालमत्ता"** म्हणून संबोधले जाते). यांच्याकडुन खरेदी करण्याकरीता श्री संतोष कुमार यांच्याशी वाटाघाटी करीत आहेत. शेतजमिनीच्या चतु:सीमा खालिलप्रमाणे आहेत: उत्तरेकडे वा त्या दिशेला : सी.टी.एस. क्र. १०२९ आणि १०३०; दक्षिणेकडे वा त्या दिशेला: सी. टी.एस. क्र. १०२३, १०२४ आणि १०२५; पश्चिमेकडे वा त्या दिशेला: सी.टी.एस. क्र. १०२६ आणि पुर्वेकडे वा त्या दिशेला: जिल्हाधिकारी कार्यालय रोड (यापुढे **"सदर मालमत्ता"** म्हणून संबोधले जाते). सदर मालमत्तेवरील मालकांचे हक्क, शीर्षक आणि हितसंबंधाची देखील आम्ही तपासत करीत आहोत.

मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, हस्तांतरण, निर्देशन, देवाणघेवाण, भाडेपट्टा, भाडेकरार, परवाना, तारण, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, भार, देखभाल, वारसाहक्क, वहिवाट, विश्वस्त, विकास ताबा किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी, दावा किंवा हितसंबंध असलेल्या सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींना याद्वारे त्याची माहिती निम्नस्वाक्षरीकर्त्यांना खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात त्याला सहाय्यभूत कागदपत्रांच्या नोटरी प्रमाणित केलेल्या प्रतींसह प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत पाठवण्याचे आवाहन केले जात आहे, अन्यथा मालकीहक्काची चौकशी अशा कोणत्याही दाव्याचा/ किंवा आक्षेपांचा संदर्भ न घेता पूर्ण केली जाईल आणि कोणताही दावा असल्यास तो सोडून दिला आणि/ किंवा माफ केला असे गृहित धरले जाईल.

**दिनांक : ०५.०४.२०२४**
**स्थान: मुंबई**

**सही/ -**
**शोएब आय. मेमन आणि इरम शोएब मेमन**
**उच्च न्यायालयाचे वकील**

**शोएब आय. मेमन आणि इरम शोएब मेमन**
**उच्च न्यायालयाचे वकील**
**दुकान क्रमांक ४, ५२६, रामा कुटीर,**
**३३वा रोड, खार पश्चिम,**
**मुंबई — ४०००५२.**

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की आमचे अशिल, महाराष्ट्र राज्यातील तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील अलिबाग शहरामधील अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये स्थित आणि वसलेले सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८५ (जुना सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. ८५ए/०) मोजमापीत १८.७० गुंठा सुसंगत सीटीएस क्र. १०२२ मोजमापीत १८७१.३० चौरस मिटर्स, सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८६/३बी (जुना सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८६ए/३बी) मोजमापीत ११.७६ गुंठा सुसंगत सीटीएस क्र. १०२४ मोजमापीत १५१७.६० चौरस मिटर्स, आणि सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८६/४ (जुना सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ८६ए/४) मोजमापीत ४२.०९ गुंठा सुसंगत सीटीएस क्र. १०२५/बी मोजमापीत ४१९९.९० चौरस मिटर्स, सीटीएस क्र. १०२५/ए मोजमापीत १४३४.८० चौरस मिटर्स, सीटीएस क्र. १०२५/सी मोजमापीत १०५.३५ चौरस मिटर्स आणि सीटीएस क्र. १०२५/डी मोजमापीत १.६७ चौरस मिटर्स असलेली जमिन (**"सदर जमिन"**) तसेच या जमिनीवर अलिबाग नगरपरिषदेच्या मुल्यांकन नोंदीनुसार मोजमापीत ४५०.०० चौरस मिटर्स किंवा त्याआसपास बांधीव क्षेत्रफळ असलेली मालमत्ता क्रमांक १७८७, १७८८ आणि १७८९ ची संरचना (**"सदर संरचना"**) (**"सदर जमिन"** आणि 'सदर संरचना" यांना यापुढे एकत्रितपणे 'सदर मालमत्ता"म्हणून संबोधले जाईल) खरेदीकरण्याकरीता (i) श्रीमती बिना प्रदीप गोरगांधी; (ii) श्रीमती सोनल मेकाल गोधवानी; आणि (iii) श्री. क्रुशांत प्रदीप गोरागांधी (यापुढे एकत्रितपणे **"मालक"** म्हणून संबोधले जाईल) यांच्याशी वाटाघाटी करीत आहेत. जमिनीच्या चतु:सीमा खालिलप्रमाणे आहेत: उत्तरेकडे वा त्या दिशेला : सी.टी.एस. क्र. १०२३, १०२७ आणि १०२८; पुर्वेकडे वा त्या दिशेला: जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता; दक्षिणेकडे वा त्या दिशेला: सी.टी.एस. क्र. १०२६, सी.टी.एस. क्र. १०२० आणि सी.टी.एस. क्र. १०२१ (जिल्हाधिकारी कार्यालय); आणि पश्चिमेकडे वा त्या दिशेला:सी.टी.एस. क्र. १०२६ (**"मालमत्ता"**).

मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, हस्तांतरण, निर्देशन, देवाणघेवाण, भाडेपट्टा, भाडेकरार, परवाना, तारण, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, भार, देखभाल, वारसाहक्क, वहिवाट, विश्वस्त, विकास ताबा किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी, दावा किंवा हितसंबंध असलेल्या सर्व किंवा कोणत्याही व्यक्तींना याद्वारे त्याची माहिती निम्नस्वाक्षरीकर्त्यांना खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात त्याला सहाय्यभूत कागदपत्रांच्या नोटरी प्रमाणित केलेल्या प्रतींसह प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत पाठवण्याचे आवाहन केले जात आहे, अन्यथा मालकीहक्काची चौकशी अशा कोणत्याही दाव्याचा/ किंवा आक्षेपांचा संदर्भ न घेता पूर्ण केली जाईल आणि कोणताही दावा असल्यास तो सोडून दिला आणि/ किंवा माफ केला असे गृहित धरले जाईल.

**दिनांक : ०५.०४.२०२४**
**स्थान: मुंबई**

**सही/ -**
**शोएब आय. मेमन आणि इरम शोएब मेमन**
**उच्च न्यायालयाचे वकील**

**शोएब आय. मेमन आणि इरम शोएब मेमन**
**उच्च न्यायालयाचे वकील**
**दुकान क्रमांक ४, ५२६, रामा कुटीर,**
**३३वा रोड, खार पश्चिम,**
**मुंबई — ४०००५२.**


# माजी राज्यपालांकडून जे. एस. एस. रायगडच्या कार्याचे कौतुक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जे.एस.एस रायगडचे पर्यावरण पूरक प्रशिक्षण केंद्र आत्मनिर्भर भारतचे एक उत्तम उदाहरण आहे असे मत उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक भेटीप्रसंगी व्यक्त केले. जे. एस. एस. रायगड च्या २० वर्षाच्या कार्याचा सक्रीय आढावा घेऊन कौतुकाची थाप त्यांनी दिली.

कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालय भारत सरकार यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत असणारी जन शिक्षण संस्थान रायगड या योजनेच्या मुख्य कार्यालय सहाण एकदंत नगर अलिबाग प्रशिक्षण केंद्राला उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक व त्यांच्या सहकारी सदस्यांनी गुरुवार (दि.०४) एप्रिल रोजी प्रत्यक्ष भेट दिली.

माजी राज्यपाल राम नाईक यांची सदिच्छा भेट जे. एस. एस. रायगडच्या कार्याला नवीन चेतना प्रेरणा व उर्जा देईल असे उद्गार कार्यक्रमप्रसंगी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमय्या व अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी व्यक्त केले, तर संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या माध्यमातून संस्था प्रगती अहवाल व पर्यावरण पूरक केंद्र माहिती सादर करण्यात आली.

पान १ वरून

## तटकरेंची बोलती बंद

तटकरे हमरापूर विभागामध्ये येऊन नुसतेच मिरवून गेले. भाताचे पंचनामे झालेत. आपल्याला नुकसान भरपाई तातडीने मिळेल.असे सांगून गेले. परंतु, आजतागायत नुकसान भरपाईचा एक रुपयाही मिळाला नाही. उगीच आम्हा गरीब शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळू नका. २०१९ च्या निवडणुकीमध्ये आम्ही आपल्याला प्रामाणिकपणे मतदान केले. परंतु, आपल्याला कधी हमरापूर विभाग आठवला नाही. आज पुन्हा आपण हमरापूर विभागामध्ये येऊन पाच वर्षांपूर्वीची पुनरावृत्ती करीत आहात. आम्ही आपल्यावर विश्वास ठेवायचा का? या प्रश्नांना खासदार सुनील तटकरेंजवळ उत्तर नव्हते.

महत्त्वाची बाब म्हणजे प्रश्न विचारणारे कार्यकर्ते हे महायुतीमधील घटक पक्षाचे कार्यकर्ते होते. त्यामुळे एकंदरीत नेते सर्व अलबेल आहे, असे दाखवत असले तरी कार्यकर्ते आणि नेत्यांचा सुसंवाद होत नाही एवढे नक्की. त्यातच जे प्रश्न हमरापूर येथे मांडण्यात आले ते सर्व वस्तुस्थितीला धरून असल्याने खासदारांचे ग्रामस्थांच्या प्रश्नांना उत्तर देण्याचे धाडसही झाले नाही. एकंदरीत सर्वसामान्य मतदारराजाने लोकप्रतिनिधीची बोलतीच बंद केल्याचे चित्र हमरापूर येथे पहावयास मिळाले.

## तटकरेंनी भान ठेवावे : गीते

आहेत.१० वर्षात विकास कुठे जन्माला आलेला दिसत नाही. पंतप्रधान विकासाच्या मुद्द्यावर निवडणुका लढवत नाहीत. ते वेगळ्या मुद्द्यावर निवडणुका लढवत आहेत. राज्यकर्ते म्हणून विकास करणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे, असे अनंत गीते म्हणाले.

भाजप लोकसभेत '४०० पार' चा नारा देत आहे . ईडी, सीबीआय, आयकर यांची मदत घेत आहे. मुख्य पक्षात फूट पाडत आहे. या गलिच्छ राजकारणामुळे देशातील जनतेला आता शंका वाटत आहे कि, देशात लोकशाही नष्ट होऊन हुकूमशाही येते की काय? असं वातावरण निर्माण झालं आहे. सत्ताधाऱ्यांवरील जनतेचा विश्वास उडालेला आहे. महाराष्ट्रातील जनता येथील सत्ताधाऱ्यांना धडा शिकवेल. या देशातील प्रत्येक नागरिकाला सत्ताधाऱ्यांबद्दल शंका आहे. असं वातावरण निर्माण होणं हे या देशातील सत्तेचा, विशेष करून प्रधानमंत्री यांचा अवमान आहे, असे शेवटी अनंत गीते म्हणाले.

## आचारसंहिता भंग झाल्याची तक्रार

कर्जत येथील वकील हृषिकेश जोशी यांनी ऑनलाईन पद्धतीने एनबीएसपी पोर्टलवर दिनांक २९ मार्च २०२४ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे चौकशी करुन आचारसंहितेचा भंग झाला किंवा कसे? याबाबत मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी आपल्या स्तरावर एक स्वतंत्र समिती गठीत केली आहे. त्या समितीचे प्रमुख म्हणून खालापूर तालुका तहसीलदार आयुब तांबोळी हे असणार आहेत. तर या समितीचे सदस्य म्हणून खालापूर अप्पर तहसीलदार पूनम कदम, कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी वैभव गारवे, कर्जत नगरपरिषद स्थापत्य अभियंता मनीष गायकवाड आणि कर्जत नगरपरिषद लेखापाल अजय जोरी हे सदस्य असणार आहेत. या समितीने अहवाल दोन दिवसात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## रिझर्व्ह बँकेची १० बँकांवर कारवाई

को-ऑपरेटिव्ह बँकेला ५९.९० लाख रुपयांपर्यंतचा दंड ठोठावला आहे. स्टँडर्ड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडला ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. निधीशी संबंधित तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल मुंबईस्थित उत्कृष्ट सहकारी बँक लिमिटेडला एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ३१ मार्च २०२३ पर्यंत बँकेच्या आर्थिक स्थितीची तपासणी आरबीआयने केली होती.आरबीआयने हावडा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेडला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. राजपालयम को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेडला संचालक, त्यांचे नातेवाईक आणि त्यांच्याशी संबंधित कंपन्यांना दिलेली कर्जे आणि ॲडव्हान्स यांच्या संदर्भात निर्देशांचे पालन न केल्याबद्दल ७५,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने हिमाचल प्रदेशातील मंडी येथील मंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडला ६ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. चिक्कमगलुरु जिल्हा सहकारी सेंट्रल बँक लिमिटेड, चिक्कमगलुरू, कर्नाटक या बँकेला ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. दिंडीगुल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, दिंडीगुल, तामिळनाडू या बँकेला २५,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९च्या काही कलमांचे पालन न केल्याबद्दल आरबीआयने मथुरा जिल्हा सहकारी बँकेला एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

## २५ रुग्णांनी रुग्णवाहिकेतून केले होते मतदान

दिवशी २५ रुग्णांना रुग्णवाहिकेतून मतदान केंद्रावर नेण्यात आले आणि त्यांनी सर्वोच्च असा मतदानाचा हक्क बजावला, असे डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले.या अनोख्या उपक्रमाची भारतीय निवडणूक आयोगानेदेखील दखल घेतली होती. २०१९ साली प्रकाशित झालेल्या हायलाइटस ऑफ २०१९ इलेक्शन या पुस्तकात या घटनेची नोंद घेतली होती. त्यांच्या पुस्तकात या अनोख्या उपक्रमाचा उल्लेख केला होता, असेही डॉ. सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले. हे माझ्या एकट्याचे श्रेय नव्हते, तर त्यामध्ये प्रशासनातील सर्व सहकाऱ्यांचादेखील तेवढाच वाटा आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

## ६ एप्रिलला सुनावणी

अर्ज फेटाळला. त्यानंतर ४ एप्रिल रोजी राहुल पाटीलच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने दोन दिवसाची तारीख दिली. आता राहुल पाटीलच्या जामीन अर्जावर पनवेल न्यायालयात ६ एप्रिल रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे राहुल पाटीलचा आधारवाडी जेलमधील मुक्काम वाढला आहे. राहुल पाटील समर्थक राहुलची जामीनावर कधी मुक्तता होईल आणि तो कधी बाहेर येईल, याची वाट पाहत आहेत.

## अवकाळीचं संकट

येत्या सहा ते नऊ एप्रिलदरम्यान राज्यात गारपिटीसह अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शुक्रवारपासूनच राज्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होताना दिसणार आहे. विदर्भात तापमानाचा पारा वाढत असला तरी गेल्या दोन दिवसांपासून सकाळच्या सुमारास मात्र ढगाळ वातावरण आहे. राज्यातील मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस तर काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. एकीकडे उष्णतेच्या लाटेचा इशारा तर दूसरीकडे अवकाळी पावसाचा अंदाज यामुळे राज्यातील नागरिकही संभ्रमात आहेत.

## अलिबागच्या नामांतराला विरोध

अशी मागणीही त्यांनी केली.

निवडणूक काळात अशी मागणी करून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम नार्वेकर यांनी करू नये, असे ही रघुजी राजे आंग्रे यांनी म्हटले आहे. अलिबाग हेच नाव राहावे असे सांगून बदलायचे झाल्यास कान्होजी आंग्रे यांच्या नावाचा विचार व्हावा, असे मत रघुजी राजे यांनी व्यक्त केले. मायनाक भंडारी याच्याबाबत माझ्या मनात आदर आहे. ऐतिहासिक अलिबाग नगरी उभारणीत, जडण घडणीत सरखेल कान्होजी आंग्रे यांचे योगदान एकमेव द्वितीय आहे. हे कोणीच नाकारु शकत नाही. अलिबागचे नाव हे ऐतिहासिक नाव आहे. या नगरीला एक ऐतिहासिक वारसा आहे. कान्होजी आंग्रेच्या कालखंडापासून ते आजवर नगरीने अनेक नवरत्न महाराष्ट्राला देशाला दिली आहेत. शहराचे नाव हे अलिबागच राहिले पाहिजे, जर बदलायचे झाल्यास कान्होजी आंग्रे यांच्या नावाचा विचार झाला पाहिजे. याबाबत राहुल नार्वेकरांनी दूर रहावे असे आंग्रे यांनी म्हटले आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी असणारा अलिबाग तालुका जगाच्या नकाशावर प्रसिद्धीस आलेला तालुका आहे. निवडणुकीच्या तोंडावर अलिबाग तालुक्याचे नाव मायनाक भंडारी करावे अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणारे राहुल नार्वेकर विधानसभेचे सभापती असले तरी त्यांचे अलिबाग तालुक्यातील विकासामध्ये योगदान शून्य आहे. केवळ चोंढी परिसरातील एका हॉटेलच्या माध्यमातून त्यांचा अलिबागबरोबर संबंध आला. कनकेश्वर फाटा परिसरात मिळकती विकत घेऊन त्या विकसित करण्याचा त्यांचा व्यवसाय असावा. त्यांनी अलिबाग तालुक्याचे नामांतर करण्यासाठीची शक्कल लढवू नये. अलिबाग तालुक्यातील अलिबाग शहरात दत्ताजी खानविलकर यांच्या कारकिर्दीत १९७८ साली क्षेत्र विकास योजना राबविण्यात येऊन त्या योजनेला श्रीबाग असे नाव देण्यात आले आहे. यामुळे अलिबाग तालुक्याचे नाव बदलण्यासाठीचे राजकारण करू नये, अन्यथा सर्वच राजकीय पक्ष या मागणी विरोधात उतरतील, असा इशारा अलिबाग नगर परिषदेचे माजी नगरसेवक अमर वार्डे यांनी दिला आहे.

## शिंदेंचा पक्ष दोन-चार महिन्यांचा

कधीही महाराष्ट्रात झाले नव्हते. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे शिवसेनेचे नेतृत्व करत होते, त्यावेळेस आमचे उमेदवार बदलण्याची हिंमत भाजपाने कधीही केली नाही. जागावाटप हे पक्षाचे होत असते त्यांनी त्यांचा-त्यांचा उमेदवार ठरवायला पाहिजे, अशा प्रकारची भूमिका असते, परंतु भाजपाने आता ही नवीनच नीती अवलंबली आहे, असे अंबादास दानवे म्हणाले.

## बोर्लीच्या सरपंचाचा मनमानी कारभार?

घेऊन मनमानी कारभार केल्याचा आरोप चुनेकर यांनी केला आहे. त्यांच्या या कारभाराविरोधात सदस्या सिध्दीता चुनेकर यांनी आवाज उठविला असून याबाबत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. त्यांना पदावरून काढण्यात यावे, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन पुकारले जाईल, असा इशाराही चुनेकर यांनी दिला आहे.


### जाहीर सूचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती सुषमा रामभाऊ गोपाळे उर्फ सुषमा चंद्रकांत थोरवे, श्रीमती सुशिला बाळाराम तुंगे, श्री वाळकु राम उर्फ रामभाऊ गोपाळे, श्री. सिताबाई रामभाऊ गोपाळे यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे टाकवे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४०/१ एकूण ६६.५० गुंठे जागा पैकी ०.२२.०० विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक ०४/०४/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो. कडाव, ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. श्रीधर पंढरीनाथ पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र आर. चौ.मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| ५१/८/अ/६ | २-५७-०० | २५.७० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- ०४/०४/२०२४

**ॲड. दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को. ऑप. हौ. सोसायटी, कामत आळी,
मु.पो. ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि. नं. | एकूण क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. गोविंद जिवन उत्तमचंदांनी | १०/४/ब | १-९४-०० | १-४० |
| | १०/१ | ०-४६-०० | ०-२८ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कुळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०५/०४/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि. नं. | एकूण क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. राजेश जिवन उत्तमचंदांनी | १०/४/क | १-९५-०० | १-४० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त , चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०५/०४/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

निवडक

## धोकादायक फलक हटविले

**पनवेल :** तळोजा प्रवेशद्वाराच्या भुयारी मार्गांवरील स्त्याच्या दोन्ही बाजूला लावण्यात आलेल्या जाहिरातींचे फलक वाहनचालक, तसेच नागरिकांसाठी धोकादायक ठरत होते. ट्रक, डम्पर अशा अवजड वाहनांच्या घर्षणामुळे फलक निखळले होते. त्यामुळे संबंधित फलक पडून अपघात होण्याची शक्यता असल्याने ते हटवण्यात यावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात आली होती. त्याची तत्काळ महापालिकेने दखल घेऊन संबंधित धोकादायक फलक हटविण्यात आले आहेत.

## प्राणिक हिलिंग कार्यशाळा

**पनवेल :** पनवेलमध्ये बेसिक प्राणिक हिलिंग कार्यशाळा २७ आणि २८ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे स्वरूप प्रशिक्षणाचे असल्यामुळे यामध्ये स्वत:चे व इतरांचे हिलींग, दूरस्थ हिलिंग, ऑरा व चक्र यांची माहिती, त्यांना स्पर्श व त्यांचे परीक्षण करणे तसेच कर्माचा सिद्धांत यांसारख्या बर्‍याच गोष्टी शिकवल्या जाणार आहेत.प्राणिक हिलिंग फाउंडेशनच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार असून त्यांच्या अधिकृत प्रशिक्षकाद्वारे हे प्रशिक्षण देण्यात येईल.

## महसूल कर्मचार्‍यांना प्रशिक्षण

**पनवेल :** मावळ लोकसभा क्षेत्रासाठी चौथ्या टप्प्यामध्ये येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी पनवेल विधानसभा क्षेत्रात निवडणूक केंद्र तयार करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी पनवेलमधील कर्मचार्‍यांची केंद्राध्यक्ष, केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी उपविभागीय कार्यालय, पनवेल यांच्या पथकाकडून पनवेल तहसील कार्यालयामध्ये कर्मचार्‍यांना प्रशिक्षण देण्यात आले.

## पार्किंगच्या वादातून मारहाण

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधील आयजीपीएल कंपनीच्या रखवालदारांनी चालक व त्याच्या मदतनीसाला बेदम मारहाण केल्याची तक्रार तळोजा पोलिसांनी नोंदविली आहे. अद्याप मारहाण करणारे रखवालदार नेमके कोण याचा शोध पोलीस घेत आहेत. ट्रेलर चालक संजय खान यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ट्रेलर चालक संजय व त्याच्या मदतनीसाला गाडी कंपनीच्या प्रवेशद्वारावर वाहन उभे केल्याने बेदम मारहाण केल्याचे संजय यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

## म्हसळ्यात गटारे धोकादायक

**म्हसळा:**म्हसळा नगरपंचायत हद्दीतील उघडी गटारे दिवसेंदिवस अडचणीचे ठरत असल्याचे चित्र आहे. म्हसळा शहरासह उपनगरात कोट्यवधी रुपयांची विकास कामे, रस्त्यालगत होणारी इमारत बांधकामे आहेत. त्यामुळे कधी रस्ता अरुंद होणे, रस्त्यालगत मातीचे ढिगारे असणे असे नित्याचे चित्र आहे.यामुळे उघडी गटारे नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना त्रासदायक ठरत आहेत. शहरात विकास कामे करताना गटारे मात्र उघडी ठेवण्यात येत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.





### विविध क्षेत्रातील मान्यवरांनी केले पाटील कुटुंबियांचे सांत्वन

मनसे नेते बाळा नांदगावकर, जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांच्यासह अन्य मान्यवरांनी पेझारी येथे पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, ॲड. आस्वाद पाटील जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, सरपंच सुमन पाटील, आदी उपस्थित होते.



### कृषीवल परिवारातर्फे मीनाक्षी पाटील यांना श्रध्दांजली

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, पत्रकार, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माजी अध्यक्षा मीनाक्षी पाटील यांचे २९ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या निधनानिमित्त वेश्वी येथील कृषीवल कार्यालयात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषीवलच्या संपादक माधवी सावंत, व्यवस्थापक रुपेश पाटील, जाहीरात व्यवस्थापक हर्षा नाईक, वरिष्ठ सहाय्यक संपादक आविष्कार देसाई, सहाय्यक संपादक सुयोग आंग्रे, उपसंपादक वैभव पाटील, डिजीटल उपसंपादक संतोष राऊळ, दर्शना पाटील यांच्यासह संपादकीय, जाहीरात, वितरण व छपाई आदी विविध विभागातील कर्मचार्‍यांनी मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

# मीनाक्षी पाटील अभ्यासू व्यक्तिमत्त्व





## सखाराम पवार यांचे प्रतिपादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मीनाक्षी पाटील यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळी ओळख निर्माण केली. राजकीय, सामाजिक, पत्रकारीता व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा एक वेगळा दबदबा होता. दहा हजारामध्ये एक असलेल्या वक्त्या म्हणून त्या होत्या. त्यांच्या वकृत्वाची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात आजही आहे. मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे असे प्रतिपादन स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कलामंचे अध्यक्ष सखाराम पवार यांनी गुरुवारी (दि.४) रोजी केले.

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनानिमित्त रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंचच्या वतीने रामनारायण पत्रकार भवनमध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी सखाराम पवार म्हणाले की, नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे काम मीनाक्षी पाटील यांनी खंबीरपणे सांभाळले आहे.

> **मीनाक्षी पाटील यांना अभिवादन**
>
> **अलिबागमधील रामनारायण पत्रकार भवनमध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.**

समाजकारण करीत असताना राजकारणातदेखील त्यांची एक वेगळी पक्कड होती. त्यांना वाचनाची फार आवड होती. अभ्यासू व्यक्तीमत्व होते. गेली अनेक वर्ष त्यांनी पत्रकार म्हणून काम करीत असताना पत्रकारांच्या प्रश्नांबाबत लढा देखील दिला. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी धुरा सक्षमपणे सांभाळली. त्यांच्या कार्याची माहिती देत जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. यावेळी अनेक मान्यवरांनीदेखील शोक व्यक्त केले.

यावेळी रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस संजय खांबेटे, उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, अलिबागचे माजी नगराध्यक्ष सतिश प्रधान, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, ॲड. वैभव भोळे, भारत रांजणकर, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे संजय बोंदार्डे, बी. जी. पाटील, दिपक पाटील, हर्षद घरत, माजी नगरसेवक आर. के. घरत, नंदु तळकर, वैशाली भिडे, विनोद टेंबूलकर, सुरेश म्हात्रे, चारुशिला कोरडे, रोहन पाटील, राजाराम भगत, ज्योती म्हात्रे, झेबा कुरेशी आदींसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## पोलीस असल्याची बतावणी करून चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पोलीस असल्याची बतावणी करून व गावात चोरी झाली असून तुमचे दागिने बघायचे आहेत असे सांगून एक लाखांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन गेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सुमित्रा सोन्गार या वावंजे येथे राहतात. घरी असताना त्यांच्याकडे आलेल्या एका व्यक्तीने आपण रत्नागिरीमधील पोलीस असून वावंजे गावात सकाळी चोरी झाली असल्याचे सांगितले. तसेच तुमच्याकडील सोन्याच्या दागिन्यांची तपासणी करायची आहे, असे सांगत त्यांचे मंगळसूत्र ताब्यात घेतले. तसेच दागिन्यांच्या पावत्याही मागवून घेतल्या व सोन्याचे दागिने आपल्याकडे घेत पोलीस स्टेशनला येऊन भेटा, असे सांगत दुचाकीवर बसून निघून गेला. पोलीस तोतया असल्याचे सम जल्यानंतर सुमित्रा यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात जाऊन गुन्हा दाखल केला.

## चांदई पूल बनलाय मृत्यूचा सापळा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

उल्हासनदीवर चांदई गावाजवळ नव्याने पूल बांधण्यात आला आहे. या पुलावरून वाहतूक देखील सुरु झाली असून सार्वजनाईक बांधकाम विभागाने पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्याची कामे अपूर्ण असताना पुलावरून वाहतूक सुरु केल्याने अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. या पुलावरून चिंचवलीकडून चांदईकडे जाताना रात्रीच्या वेळी वाहने वेगात असल्यास थेट उल्हास नदीमध्ये जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चार कोटी खर्चून उल्हास नदीवर पूल बांधण्यात आला आहे. चांदई येथे २००० साली पूल बांधण्यात आला होता त्या पूलावरुन एकच वाहन जात असल्याने दुसर्‍या वाहनाला थांबावे लागात होते, त्यामुळे सातत्याने दुसरा पूल उभारण्याची मागणी होत होती. उल्हासनदीवर चांदई पूल बांधण्याचे काम मंजूर झाले. त्या पुलाचे



बांधकाम पूर्ण होऊन मार्च २०२४ मध्ये या पुलावरून वाहतूक सुरु झाली. पुलाचे बांधकाम केले जात असताना पुलाच्या दोन्ही बाजूला संरक्षण कठडे उभारले जातात. मात्र, चांदई येथील पुलाच्या दोन्ही बाजूला कोणत्याही प्रकारचे संरक्षण कठडे बांधण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहने वेगाने आल्यास ती वाहने थेट नदीत जाऊ शकतात.

उल्हास नदीवरील या पुलावर निर्माण करण्यात आलेल्या मृत्यूच्या सापळा बनला म्हणून स्थानिक ग्रामस्थ आणि माजी सरपंच संतोष कोळंबे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागांच्या अधिकार्‍यांना ही बाब सांगितली आहे.

# जलप्रदूषणामुळे मच्छिमार त्रस्त

**। पाली । वार्ताहर ।**

जिल्ह्याला २४० किमीचा सागरीकिनारा लाभला आहे. येथील कोळीबांधव आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून करतात; परंतु सध्या सर्वत्र मासळीचा दुष्काळ पडला आहे. नैसर्गिक संकटे, प्रदूषण व सरकारी धोरणांमुळे मत्स्यदुष्काळ ओढवला असल्याचे कोळीबांधवांचे म्हणणे आहे. शासनाने कोळीबांधवांसाठी मदत केली पाहिजे, अशी मागणी समस्त कोळी समाजाकडून करण्यात येत आहे.

वारंवार येणारी नैसर्गिक आपत्ती, वादळे आणि सरकारचे उदासीन धोरण यामुळे कोळीबांधवांच्या जीवनात वारंवार संकटे येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. येथील मत्स्यव्यवसाय



■ **रासायनिक सांडपाण्याची समुद्रात विल्हेवाट**

धोक्यात आला आहे.

मच्छीमारांना असंख्य सम स्या भेडसावत आहेत. जेट्टी, स्वच्छतागृह, शीतगृह यांचा अभाव तसेच कारखान्यातील केमि कलयुक्त, रासायनिक द्रव्य समुद्रात सोडले जात असल्याने जलप्रदूषण वाढले आहे. त्याचा परिणाम मत्स्य उत्पादनावर झाला आहे. माशांच्या प्रजाती दुर्मिळ झाल्याचे कोळीबांधव सांगत आहेत. यावर उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरत आहे. रासायनिक कारखान्यामधील सांडपाण्याची समुद्रामध्ये विल्हेवाट लावली जाते. त्यातून होणारे जलप्रदूषण कोळी समाजाला उद्ध्वस्त करत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. पारंपरिक मासेमारी कोळीबांधवांना परवडत नाही. अत्याधुनिक व तंत्रयुक्त पद्धतीने मत्स्यव्यवसाय करावा तर सरकारची उदासीनता दिसून येत आहे.

या विभिन्न समस्येवर महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने वारंवार आवाज उठवला आहे. मात्र, सरकार या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने ही भयानक परिस्थिती ओढवली आहे.

# पनवेल महापालिका आयुक्तांच्या प्रतीक्षेत

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता घोषित झाल्यानंतर एकाच महापालिकेत तीन वर्षपेक्षा अधिक वेळ काम केल्यामुळे महापालिकेचे आयुक्त व प्रशासक गणेश देशमुख यांची बदली झाली. देशमुख यांच्या बदलीनंतर महापालिकेचे आयुक्तपद गेले दोन आठवड्यांपेक्षा अधिक काळ रिक्त आहे. या रिक्त पदावर अद्याप नगरविकास खात्याकडून कोणत्याच अधिकार्‍याची नियुक्ती करण्यात न आल्याने महापालिकेचा कारभार अडचणीत आला आहे. आयुक्तपदाचा कारभार अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्याकडे देण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानंतर नगरविकास विभागाने २० मार्चला काढलेल्या आदेशानुसार बदली झालेल्या अधिकार्‍यांना पद सोडावे लागले. महापालिका ही ‘ड’ वर्गातील महापालिका आहे. डॉ. सुधाकर शिंदे सोडले तर अद्याप एकही आयएएस दर्जाचा अधिकारी महापालिकेवर आलेला नाही. देशमुख यांच्यासोबत उपायुक्त गणेश शेटे, सचिन पवार यांच्या बदल्या झाल्या. त्या रिक्त जागेवर डॉ. बाबासाहेब राजळे, मारुती गायकवाड या दोन अधिकार्‍यांची नियुक्ती झाली; परंतु नगरविकास विभागाला आयुक्तपदावर अधिकारी पाठवण्याचा मुहूर्त मिळाला नाही.


# तलावाकाठी दुकाने उभारण्यास विरोध

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील वडाळे तलावाच्याकाठी खाद्य पदार्थ विक्रीची दुकाने महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मिळत असल्याने या दुकानांना पनवेलकरांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याला विरोध करायला सुरुवात केली आहे.

वडाळे तलाव ही निसर्गाने दिलेली एक देणगी आहे. पनवेलकर नागरिकांना या वडाळे तलावाचा अभिमान आहे. अलीकडच्या काळात महानगरपालिकेने वडाळे तलावाच्याकाठी बांधकाम करून तलावाचे व तलाव परिसराचे सुशोभीकरण केले आहे.

वडाळे तलावाचा परिसर नागरिकांसाठी सकाळ-संध्याकाळ मोकळ्या हवेत फिरण्यासाठी,



मोकळ्या हवेत व्यायाम करण्यासाठी, तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध झाला आहे.

वडाळे तलाव व तलावाचा सर्व परिसर अधिकाधिक नैसर्गिक, शांत व रम्य कसा होईल याकडे महानगरपालिकेने लक्ष दिले पाहिजे. त्याच प्रांगणात तसेच तलावाच्या काठी इतरत्र खाद्य वस्तूंची व इतर वस्तुंची दुकाने थाटण्यात येणार आहेत. अशी दुकाने येथे सुरू केल्यास तलावाच्याकाठी बकालपणा वाढेल.

तलावाचा परिसर मोकळेपणाने निवांत फिरण्यासाठी उपलब्ध असला पाहिजे असे पनवेलकरांचे म्हणणे आहे.

तरी दुकाने, व्यापार, वस्तु विक्री करणार्‍या हातगाड्या वगैरसाठी वडाळे तलावाचा परिसर वापरू देऊ नये अशी पनवेलकरांना मागणी केली आहे.

### अनेक सोयी-सुविधांपासुन वंचित, न्यायासाठी अनेक वर्ष फरफट

# ग्रामीण डाक सेवकांची न्यायासाठी परवड

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

दिडशे वर्षांची परंपरा असलेल्या व दिड लाख खेडोपाड्यात काम करणार्‍या साडेतीन लाख ग्रामीण डाक सेवकांना टपाल खात्यात मागील ७६ वर्षांपासून कोणत्याही सोयीसुविधा दिल्या जात नाहीत. फक्त नावापुरतेच उरलेल्या केंद्र सरकारच्या सेवकांची न्यायासाठी अनेक वर्षांपासून फरफट सुरूच असल्याच्या व्यथा ग्रामीण भागात ग्रामीण डाक सेवक म्हणून काम करणार्‍या अनेक कर्मचार्‍यांनी मांडल्या आहेत.

देशातील टपाल खात्याला दिडशे वर्षांची परंपरा आहे. या टपाल खात्याच्या अखत्यारीत दिड लाख खेड्यात काम चालते. या दिड लाख गावांतील



खेडोपाड्यात शाखा पोस्ट ऑफिसमध्ये साडेतीन लाख ग्रामीण डाक सेवक काम करीत आहेत. मात्र दिड लाख खेडेगावांतील शाखा पोस्ट ऑफिसांच्या जोरावर टपाल खाते चालवणार्‍या खात्याला अजूनही खेड्यातील शाखा ऑफिसला स्वत:च्या मालकीचे पोष्टाचे छोटेशे ऑफिसही देता आलेले नाही. ही मोठी खेदाची गोष्ट आहे. जे कोणी शाखा पोस्टमास्तर म्हणून काम करीत आहेत. त्यांच्याच घरात ऑफिस ठेवण्यात येते. त्याचा कुठल्याही प्रकारचा मोबदला दिला जात नाही. आज आपण पाहिले तर खेड्या पाड्यांतील मागून आलेल्या बँका-पतपेढ्या स्वत:च्या मालकीच्या जागेत काम करीत आहेत.

सध्या गावांगावामध्ये जे कर्मचारी शाखा ऑफिसमध्ये काम करीत आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारच्या सोयी-सुविधा मिळत नाहीत. निव्वळ रोजंदारीवर ग्रामीण डाक सेवक या नावावर काम करुन घेतले जाते. इतर सर्व क्षेत्रांतील कर्मचार्‍यांना रजा, पीएफ, सीएफ, ग्रॅज्युएटी, सर्व्हिस फंड अशा विविध सुविधा मिळतात. तसेच पोस्टातील ग्रामीण डाक सेवक सेवा निवृत्त झाला की, त्याला दीड-दोन लाख रुपये देऊन त्यांची सेवा पूर्ण केली जाते. मात्र केंद्रीय कर्मचारी असतानाही त्यांना या सोयी सुविधा का मिळत नाहीत.

देशातील आमदार, खासदारांना पेन्शन तसेच वेग-वेगळ्या गटांतील लोकांना वेग-वेगळ्या योजनांमार्फत पेन्शन दिली जाते. मात्र ज्यांनी आपले आयुष्य नोकरीत राहून जनतेची सेवा केली. त्यांना पेन्शन नाही. नावाला केंद्रीय कर्मचारी परंतू, कुठल्याही प्रकारच्या सोई-सुविधा नाहीत.ग्रामीण भागामध्ये खेडो-पाडी ब्रँच पोस्ट ऑफिसमध्ये काम करणार्‍या पोस्टाच्या साडेतीन लाख ग्रामीण डाक सेवक मागील ७६ वर्षांनंतरही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.



# संशय फिटलाच पाहिजे

इव्हीएम अर्थात निवडणूक मतदानयंत्रांबाबत सर्वच पक्षांनी सातत्याने शंका घेतली आहे. भाजप सत्तेबाहेर होते तेव्हा तेही यंत्रांच्या विरुध्द होते. त्यावेळी आरोपसम्राट किरीट सोमय्या यांनी यंत्राच्या वापराविरुध्द रान उठवले होते.या यंत्रांमुळे मतदान व मोजणी यातला बराच त्रास व वेळ वाचतो हे खरे आहे.पूर्वी मतपत्रिकांची छपाई करणे व नंतर त्यांची देखभाल तसेच हाताळणी करणे फार जिकिरीचे होते. मतपेट्या पळवल्या जात. पुन्हा मतदान घ्यावे लागे. हा त्रास यांत्रिक सुविधेमुळे खूपच कमी झाला. गंमत अशी आहे की, जगातील अमेरिकेसह अनेक श्रीमंत देशांमध्ये आजही छापील मतपत्रिका वापरल्या जातात. वास्तविक तंत्रज्ञानाच्या बाबतीत ते भारताच्या कितीतरी पुढे आहेत. तेथील जनता देखील इथल्यापेक्षा अधिक साक्षर आहे. तरीही मतदानासाठी यंत्रे वापरण्यात त्यांना धोका वाटतो. ही यंत्रे आजच्या काळानुसार इलेक्ट्रॉनिक असणार. त्यामुळे ती हॅक होण्याचा धोका त्यांना वाटतो. गेल्या अध्यक्षीय निवडणुकीत अमेरिकेत रशियाने ट्रम्प यांना मतदान व्हावे यादृष्टीने प्रचारात हस्तक्षेप केल्याचा आरोप झाले होते. त्याचाच पुढचा भाग म्हणजे रशिया किंवा चीनमधील हॅकर्स अमेरिकेतील मतदानातही गडबड करू शकतात असे तेथील अधिकाऱ्यांना वाटते. भारतात मात्र असा धोका कोणालाही जाणवला नाही. भारताने संगणक किंवा मोबाईल जसे सहज आपलेसे केले तसेच मतदानयंत्रांची पध्दतही लोकांनी सहजपणे स्वीकारली. गेल्या काही वर्षांमध्ये मात्र त्यात भानगडी केल्या जाण्याची शक्यता जाणकारांना जाणवू लागली आहे. त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणीही वाढते आहे. काही जणांनी पुन्हा मतपत्रिकांद्वारे मतदान सुरू करण्यासाठी आंदोलन सुरू केले आहे. तर काही जणांनी यंत्रांच्या वापरात अधिकाधिक काळजी कशी घेता येईल याचे पर्याय सुचवले आहेत. सर्वोच्च न्यायालयापुढे याबाबत याचिका आल्या असून निवडणूक आयोग व केंद्र सरकारला या संदर्भात उत्तरे देण्यासाठी नोटिसा काढण्यात आल्या आहेत.

### नेमका आक्षेप काय

पूर्वी मतपत्रिकेतील उमेदवारासमोरच्या त्याच्या निशाणीवर शिक्का मारला जाई. मग ती पत्रिका घडी करून पेटीत टाकली जाई. आता यंत्रावर बटण दाबून मतदान केले जाते. मात्र आपण ज्या बटणावर बोट दाबले त्याच उमेदवार व पक्षाला आपले मत गेले आहे की नाही हे समजण्याला आरंभी कोणताही वाव नव्हता. यावर उपाय म्हणून व्हीव्हीपॅट किंवा मतदानाची पावती देणाऱ्या यंत्राची जोड देण्यात आली. २०१४ नंतर हा बदल करण्यात आला. यंत्रावर बटण दाबले की मत दिले जाई. नंतर या पावतीवाल्या मशिनमध्ये ज्या उमेदवार व पक्षाला मत दिले गेले आहे त्याच्या नावाची पावती छापली जाई. ती पावती मतदाराला काही सेकंद तेथेच दिसेल अशी व्यवस्था या व्हीव्हीपॅट यंत्रणेत करण्यात आली. त्यामुळे आपण ठरवल्याप्रमाणे मतदान झाले याची खातरजमा मतदाराला होते. ती पावती तेथेच एका सीलबंद पेटीत आपोआप जमा होते. मात्र टप्प्यांमध्ये या यंत्रणेत गडबड करता येणे शक्य आहे असे अनेक तज्ज्ञांनी दाखवून दिले आहे. माधव देशपांडे यांच्या याबाबतच्या अनेक मुलाखती उपलब्ध आहेत. व्हीव्हीपॅटच्या आगमनानंतर मतदानयंत्रात एकूण तीन उपकरणांचा समावेश झाला. एक म्हणजे मतदार ज्याच्यावर बटण दाबतो ते यंत्र. दुसरे त्या बटणानुसार मताची नोंद इलेक्ट्रॉनिक कार्डावर करणारे यंत्र व तिसरे म्हणजे मताची पावती देणारे व्हीव्हीपॅट. जाणकारांच्या म्हणण्यानुसार, मतदाराने बटण दाबल्यानंतर व्हीव्हीपॅटवर त्याची पावती योग्य दिसली तरीही या यंत्रणेत भानगड होऊ शकते. त्यानुसार, समजा एखाद्याने शेकापच्या चिन्हासमोरचे बटण दाबले तरी प्रत्यक्षात ते भाजपच्या पारड्यात जाईल अशा रीतीने खेळ करता येऊ शकतो. हे करण्यासाठी मतदानयंत्रामध्ये काही मामुली फेरफार करावे लागतील. सकाळी आठनंतर ही भानगडीची यंत्रणा चालू व्हावी असा टायमर त्यात लावता येऊ शकतो.

### दुहेरी मोजणी हवी

यात भानगडीची शंका येऊ नये अशा युक्त्याही करता येऊ शकतात. पडणारी शंभर टक्के मते भाजपला गेली तर संशय वाढेल. त्यासाठी पडणाऱ्या मतांमधले प्रत्येक तिसरे मत भाजपला जावे अशा रीतीने अशी सूचना या यंत्राला दिली जाऊ शकते. असा भ्रष्टाचार होऊ नये यासाठीच खरे तर व्हीव्हीपॅट यंत्रणा उभारण्यात आली. आपण गुगल पे किंवा तत्सम माध्यमातून दुकानदाराला पैसे दिले की ते थेट बँकेत जमा होतात. गरज असेल तर आपल्याला त्याची पावतीही मिळू शकते. त्या दोन्ही गोष्टी ताडून ताळा करता येऊ शकतो. मात्र आपल्याकडे लोकांच्या समाधानासाठी व्हीव्हीपॅट यंत्र बसवले असले तरी त्यातल्या पावत्या मोजल्या जात नाहीत. आधी प्रत्येक लोकसभा निवडणुकीत सहापैकी एका विधानसभा मतदारसंघातल्या काही यंत्रांच्या पावत्या चाचणीदाखल मोजल्या जात असत. २०१९ ला एक याचिका दाखल झाल्यावर पाच मतदारसंघातल्या पावत्या मोजल्या जातात. मात्र या सर्वच्या सर्व पावत्यांची स्वतंत्र मोजणी करून ती इलेक्ट्रॉनिक मोजणीशी जुळते आहे की नाही हे पाहावे अशी विरोधकांची मागणी आहे. तीच आता सर्वोच्च न्यायालयापुढे आहे. असे केल्यास मोजणीला काही तास आणखी लागतील अशी सबब निवडणूक आयोगाने दिली आहे. मात्र निवडणूक चोख होणे हे लोकशाहीसाठी अत्यंत कळीचे आहे. त्यादृष्टीने आणखी काही तास मोजणीसाठी गेले तरी ते परवडू शकतात. युरोप किंवा अमेरिकेत अशाच मोजणीला काही दिवस लागत असतातच. अशा दुहेरी मोजणीला परवानगी मिळाली तर व्हीव्हीपॅटमधून जमा होणाऱ्या मतांच्या कागदी पावत्या आणि यंत्रामध्ये होणारी परस्पर नोंद यांचा ताळा करता येईल. तो तंतोतंत जुळला तरच ही यंत्रणा बिनधोक आहे असे समजता येईल. यापूर्वी या यंत्रांमध्ये पडलेली मते व एकूण उमेदवारांना मिळालेली मते यांचा ताळा न जमल्याच्या तक्रारी अनेक ठिकाणांहून आल्या आहेत. अशा कोणत्याही तक्रारींना वाव ठेवायचा नसेल तर दुहेरी मोजणी ही अपरिहार्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने यंदाच्या निवडणुकीपासूनच ही मोजणी अनिवार्य करायला हवी.

विचार

# गुंतवणूकदारांची मोहोर, व्यापाराला घोर...

**जागतिक गुंतवणूकदार चीनच्या तुलनेत भारताला अधिक पसंती देत असल्याचे अलिकडे नव्याने अधोरेखीत झाले. दरम्यान, अमेरिकेतील बाल्टिमोरच्या की ब्रिज परिसरात कंटेनर जहाजाची टक्कर झाल्याच्या घटनेचा अमेरिकेसह जगातील देशांना फटका बसू शकतो. यामुळे अमेरिकेतून भारताला होणाऱ्या कोळश्याच्या पुरवठ्यावरही परिणाम होऊ शकतो. याच सुमारास लिंबाच्या दरात साडेतीनशे टक्क्यांची वाढ झाल्याने उत्पादक खुशीत आहेत.**

गुंतवणुकीच्या बाजारात अलिकडे भारताचे तारे चमकताना दिसत आहेत. याबाबत चीनच्या तुलनेत भारताला अधिक पसंती मिळत असल्याचे नव्याने अधोरेखीत झाले आहे. दरम्यान, अमेरिकेतील बाल्टिमोरच्या की ब्रिज परिसरात कंटेनर जहाजाची टक्कर झाल्याच्या घटनेचा अमेरिकेसह जगातील देशांना फटका बसू शकतो. यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची शक्यता असून अमेरिकेतून भारताला होणाऱ्या कोळश्याच्या पुरवठ्यावरही परिणाम होऊ शकतो. याच सुमारास लिंबू टिंबू लिंबाच्या दरात साडेतीनशे टक्क्यांची वाढ झाली आहे.

परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात मागील आर्थिक वर्षात दोन लाख कोटींहून अधिक रुपयांची गुंतवणूक केली. विशेष बाब म्हणजे या आर्थिक वर्षात गुंतवणूकदारांनीच इक्विटी मार्केटवर मेहरबानी केली नाही तर कर्ज आणि रोखे बाजारातही बरीच गुंतवणूक केली आहे. गुंतवणूकदार भारतीय बाजारावर एवढी मेहरबानी करतील, याचा जगात कोणीही विचार केला नव्हता. गेल्या पाच वर्षांमध्ये दुसऱ्यांदा असे घडले. त्यामुळे चीनलाही धक्का बसला. या काळात गुंतवणूकदारांनी रोखे बाजारात एक लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. गेल्या एक वर्षापासून जागतिक आर्थिक भावना वाईट असूनही ही गुंतवणूक झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक




वर्षात विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात मोठी खरेदी केली. गेल्या पाच आर्थिक वर्षांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी दोन लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याची ही दुसरी वेळ आहे. 'एनएसडीएल'च्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात विदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजारात दोन लाख आठ हजार २१२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. यापूर्वी २०२०-२१ या आर्थिक वर्षात विदेशी गुंतवणूकदारांनी दोन लाख ७४ हजार ३२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती.

विदेशी गुंतवणूकदारांनी गेल्या ३० वर्षांमध्ये केलेली ही विक्रमी गुंतवणूक आहे. त्या वर्षी

**महेश देशपांडे**

मार्च महिन्यात गुंतवणूकदारांनी ३५ हजार ९८ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. चालू वर्षात हा आकडा दहा हजार ८९३ कोटी रुपये आहे. प्रत्यक्षात जानेवारी महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून २५ हजार ७४४ कोटी रुपये काढून घेतले होते. फेब्रुवारीमध्ये १५३९ कोटी रुपयांची नाममात्र गुंतवणूक झाली. गेल्या दहा वर्षांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी कर्ज आणि रोखे बाजारात एक लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याची ही तिसरी वेळ आहे. या वेळी रोखे बाजाराने सात वर्षे जुना विक्रम मोडला आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षात विदेशी गुंतवणूकदारांनी एक लाख १९ हजार ३६ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती तर २०२३-२४ या आर्थिक वर्षात ही गुंतवणूक एक लाख २१ हजार ५९ कोटी रुपये होती; मात्र २०१४-१५ या आर्थिक वर्षात सर्वाधिक गुंतवणूक दिसून आली. त्यानंतर गुंतवणूकदारांनी रोखे बाजारात एक लाख ३० हजार ३०२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. तथापि, विदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजार आणि बाँड मार्केट या दोन्हींमध्ये एक लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केल्याची ही गेल्या ३० वर्षांमधील पहिलीच वेळ आहे. विशेष म्हणजे या आर्थिक वर्षात परदेशी गुंतवणूकदारांकडून एकत्रितपणे तीन लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झाली आहे.

दरम्यान, अमेरिकेतील बाल्टिमोरच्या की ब्रिज परिसरात कंटेनर जहाजाची टक्कर झाल्यानंतर पूल पत्त्याच्या डेकसारखा कोसळला. पूल कोसळल्याचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. व्हिडिओमध्ये एक मोठे कंटेनर जहाज पुलाच्या खांबाला आदळताना दिसते. त्यानंतर पूल पटापस्को नदीत बुडाला; मात्र हा पूल कोसळल्याने पुढील अनेक महिने अमेरिकेसह जगातील देशांना फटका बसू शकतो. किंबहुना, यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची शक्यता आहे. पनामा कालव्यातील दुष्काळ आणि लाल समुद्रात हुथी बंडखोरांनी केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे जागतिक पुरवठा साखळी आधीच विस्कळीत झाली आहे. आता बाल्टिमोरमधील पूल कोसळल्याने त्याच्या समस्या वाढल्या आहेत. पुलाला तडे गेल्याने त्या मार्गावरून जाणारी सर्व जहाजे थांबवण्यात आली आहेत. त्यामुळे फोर्ड मोटर आणि जनरल मोटर्सच्या शेकडो गाड्या अडकून पडण्याचा धोका आहे. तसेच २५ लाख टन कोळसा अडकला आहे. त्यामुळे अमेरिकेतून भारताला होणाऱ्या कोळश्याच्या पुरवठ्यावरही परिणाम होऊ शकतो.

'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार, बाल्टिमोर दुर्घटनेमुळे न्यू जर्सी आणि व्हर्जिनिया बंदरांवर दबाव वाढू शकतो. बाल्टिमोर हे अमेरिकेतील पूर्व किनाऱ्यावरील सर्वात व्यस्त बंदरांपैकी एक आहे. कार आणि हलके ट्रक बनवणाऱ्या युरोपीयन कंपन्यांसाठीही हे एक अतिशय महत्त्वाचे बंदर आहे. या बंदराभोवती मर्सिडीज, फोक्सवॅगन आणि बीएम डब्ल्यूची युनिट्स आहेत. याशिवाय अमेरिकेतून कोळसा निर्यातीसाठी बाल्टिमोर हे दुसरे मोठे टर्मिनल आहे. विशेषतः भारतातील कोळशाच्या निर्यातीवर याचा परिणाम होऊ शकतो. भारताच्या एकूण कोळसा आयातीत अमेरिकेचा वाटा सहा टक्के आहे. कोळशाची सर्व निर्यात बाल्टिमोर बंदरातून होते. भारतातील कोळशाचा वार्षिक वापर एक हजार दशलक्ष टन आहे. त्यापैकी २४० दशलक्ष टन आयात केला जातो. त्यानुसार बाल्टिमोर दुर्घटनेमुळे भारताचे करोडोंचे नुकसान होऊ शकते. या दुर्घटनेनंतर जवळपास डझनभर जहाजे बाल्टिमोर बंदरात अडकली. यामध्ये मालवाहू जहाज, ऑटोमोबाईल कॅरिअर आणि टँकरचाही समावेश होता. याशिवाय अनेक टगबोटीही तेथे अडकून पडल्या. दररोज ३५ हजार लोक या पुलाचा वापर करतात. सुमारे २८ अब्ज डॉलर किमतीचा माल दर वर्षी त्यातून जातो. हा पूल बांधण्यासाठी पाच वर्षे लागली आणि तो १९७७ मध्ये पूर्ण झाला. त्याची किंमत सुमारे १४१ दशलक्ष डॉलर्स होती. बाल्टिमोर बंदरातील कामकाज पूर्ववत होण्यासाठी काही महिने लागू शकतात. यासाठी ६०० दशलक्ष डॉलर्स खर्च होऊ शकतात

आता वार्ता भाव खाणाऱ्या लिंबाच्या बाजारपेठेची. सध्या देशातला उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची काहिली होत आहे. देशातील बहुतांश भागात पारा ४० अंशाच्या आसपास गेला आहे. दरम्यान, या वाढत्या तापमानात लोक लिंबू सोडा, विविध प्रकारचे कोल्ड्रिंक घेत आहेत. त्यामुळे सध्या बाजारात लिंबाच्या दरात तेजी आली आहे. सहाजिकच विक्रीसाठी लिंब उपलब्ध असणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. लिंबाच्या दरात ३५० टक्क्यांची वाढ झाली आहे. यापूर्वी लिंबू सोडा २० रुपये प्रति ग्लास दराने विकला जात होता. आता लिंबू सोडा २५ ते ३० रुपये प्रति ग्लास दराने विकला जात आहे. दरम्यान, तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्यामुळे पुढच्या काळात लिंबाच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम आकाराच्या लिंबाला प्रति किलो शंभर रुपयांचा दर मिळत आहे. उन्हाचा चटका वाढल्याने बाजारात लिंबाची मागणी वाढत आहे. त्यामुळे दरातही वाढ होत आहे.

सध्या कर्नाटक राज्यात किरकोळसह घाऊक बाजारातही लिंबाच्या दरात वाढ झाली आहे. ही वाढ ३५० टक्क्यांची आहे. दरम्यान, तापमानात अशीच वाढ होत राहिली तर लिंबे आणखी महाग होऊ शकतात. दुष्काळी परिस्थिती आणि बदलत्या हवामानाचा काही ठिकाणी लिंबाला फटका बसला आहे. अनेक ठिकाणी लिंबाच्या बागांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे बाजारपेठेत सध्या लिंबाचा म्हणावा तेवढा पुरवठा नाही. पुरवठा कमी झाल्याचा परिणाम दरांवर झाला आहे. लिंबू विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महिनाभरापूर्वी एक हजार लिंबांचा दर दोन हजार रुपये होता. आता याच एक हजार लिंबाचा दर सात हजार रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. त्यामुळे याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होत आहे.

आजकाल

# मुलुख मैदानी तोफ रणरागिणी हरपली

राज्यमंत्री शेतकरी कामगार पक्षाची मुलुख मैदानी तोफ असणारी मीनाक्षी ताई पाटील ह्यांचे दि. २९-०३-२०२४ रोजी निधन झाले. ही बातमी ऐकताच माझे मला हेलावून गेले. मला अतीव दु:ख झाले. मीनाक्षी ताई पाटील यांचे आणि माझे जिव्हाळ्याचे संबंध १९ फेब्रुवारी १९८६ पासून होते. त्यावेळी त्या जिल्हा परिषद सदस्य होत्या. आजही मला तो दिवस आठवतो. रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यामधील अतिदुर्गम भाग म्हणून ओळखला जाणारा कुडपण या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या स्थायी परिषदेच्या समिती बैठक रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष स्वर्गीय. प्रभाकर पाटील यांनी लावली होती. सदर स्थायी समितीच्या बैठकीत सदस्या या नात्याने मीनाक्षी ताई पाटील यांनी कुडपण आणि पोलादपूर तालुक्यासाठी विकासाचे मुद्दे अगदी आक्रमकपणे सभेत मांडत होत्या. सदरचे मुद्दे मांडत असताना मी त्याचा आक्रोश अणि आक्रमकपणा जवळून पाहिला. उपस्थित लोकांच्या अंगावर त्यांची आक्रमक भाषणे ऐकताना शहारे येत होते. मीनाक्षी ताई पाटील यांची जिल्हा परिषद मधील कामगिरी अत्यंत उत्तम झाली म्हणूनच काय त्याची पोहच पावती म्हणून त्यानंतर अलिबाग विधानसभेच्या त्या आमदार म्हणून भरघोस मतांनी निवडून आल्या. मीनाक्षीताई पाटील ह्या अत्यंत हुशार अभ्यासू आमदार म्हणून त्यांचा नावलैकिक होता. विशेष म्हणजे विधानसभेच्या सभागृहामध्ये त्या त्यांची भुमिका अत्यंत आग्रहीपणाने व आक्रमणपणे मांडत असत. एक धाडसी नेतृत्व एक धाडसी महिला एक धाडसी आमदार म्हणून त्यांचा विधानसभेमध्ये सातत्याने नावलौकिक होत असे. रायगड जिल्ह्यामध्ये जिल्ह्याचा विकास होण्याच्या दृष्टीने अत्यंत त्यांचे मोलाचे योगदान आहे. मीनाक्षीताई पाटील यांच्याबरोबर मला काम करण्याची संधी मिळाली याचे मी परमभाग्य समजतो.

**अजयकुमार सर्वगोड**

मीनाक्षी ताई पाटील यांची सुन सौ. चित्राताई कुबल- पाटील ह्या होय. सौ.चित्राताई ह्या मुळच्या वेंगुर्ला जि.सिंधुदुर्गच्या आहेत. मीनाक्षीताई पाटील यांनी आपल्या सुनेला जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आणले. तसेच सौ. चित्राताई पाटील यांना अर्थ व बांधकाम सभापती पद सुध्दा मिळवून दिले त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीतर बांधकाम व अर्थ विभागाचा कारभार गतिमान व पारदर्शकपणे कसा करायचा, भाषणे कशी करायची अर्थसंकल्पीय भाषण कसे असले पाहिजे. जिल्ह्यांच्या विकासासाठी कोणकोणत्या बाबी अर्थसंकल्पात प्राधान्याने घेतल्या पाहिजे हे अंत्यंत बारकाईने समजून सांगत असे. सौ. चित्राताई पाटील आणि मिनाक्षी ताई पाटील आम्ही एकत्र जिल्हा दौरे करीत असू. चित्राताई ला ते नेहमी म्हणत अजयकुमार सर्वगोड हा जुन्या पिढीतील इंजिनिअर आहे. त्याला माझ्या दादांनी (स्वर्गीय प्रभाकर पाटील) नोकरी लावले आहे. हा फार हुशार आणि प्रामाणिक इंजिनिअर आहे. याला बरोबर घेतल्याशिवाय तू जिल्हा परिषदेचा कारभार करत जाऊ नको असे चित्राताई पाटील यांना नेहमी सांगत. तसेच मला नेहमी सांगत माझी सुन ही माझी भाग्यलक्ष्मी आहे. अजकुमार सर्वगोड तिला बांधकाम व अर्थ याचा कारभार गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी सर्वतोपरी मदत करीत जा असे मला नेहमी सांगत. मी मीनाक्षी ताई पाटील यांनी दिलेल्या सुचनाचे तंतोतंत पालन केले. सौ. चित्राताई पाटील यांना मी आणि श्री.जी.एच.पाटील आम्ही खुप खुप त्याच्या कामात मदत केली. विशेष म्हणजे बांधकाम व अर्थ विभागात चित्राताई पाटील यांची सभापती म्हणुन कामगिरी न भुतो न भविष्य अशी झाली याचे सर्व श्रेय आदरणीय मीनाक्षी ताई पाटील यांना जाते.

मला मीनाक्षी ताई पाटील यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली हे माझे मी परम भाग्य समजतो. मीनाक्षीताई पाटील त्यांनी मला खुप मुलासारखे प्रेम दिले मला त्यांनी खुप आधार दिला. त्यांच्या जाण्याने मला अतिशय दु:ख झाले आहे. मीनाक्षीताई पाटील यांच्या जाण्याने संबंध रायगड जिल्हयाचे अतोनात नुकसान झाले आहे. ताईंची विधानसभेतील आमदार म्हणून, राज्यमंत्री म्हणून कारकीर्द वाखण्यासारखी आहे. त्यांनी जिल्हा परिषद सदस्य आमदार राज्यमंत्री अत्यंत महत्वाची चोख कामगिरी बजावली. त्यांनी त्याचा कार्याचा अलौकिक कामाचा ठसा सुध्दा उमटवला आहे. त्यांच्या जाण्याने प्रचंड पोकळी निर्माण झाली आहे. मीनाक्षीताई पाटील यांच्या कार्याला लाख लाख सलाम. त्यांच्या कार्याला, विचाराला आणि प्रेरणादायी स्मृतीला माझी भावपूर्ण श्रद्धांजली व आदरांजली.

लोकसंसद

### भारताचे अब्जाधीश वाढले, यांची संपत्तीही वाढली

अमेरिकी बिझनेस मॅगझीन फोर्ब्ज अब्जाधीश लोकांची एक यादी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. त्या यादीत २०२४ मध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज चे चेअरमन मुकेश अंबानी नवव्या स्थानी आहेत. त्यांची संपत्ती ११६ अब्ज डॉलर्स एवढी आहे. इतकेच काय पण ते आशियांतील व भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून सुद्धा नावाजले आहेत. ही बातमी नुकतीच वाचली अब्जाधीश संख्या सुद्धा मागील वर्षीच्या १६९ वरून ते २०० वर गेली आहे. या सर्व अब्जाधीशांची संपत्ती ४१ टक्क्यांनी वाढली आहे. भारतातील सर्वात श्रीमंत महिला सावित्री जिंदाल या आहेत. त्या श्रीमंतीत भारतात चौथ्या क्रमांकावर आहेत. जगात सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून बर्नार्ड हे आहेत.त्यांची संपत्ती तब्बल २३३ अब्ज डॉलर्स एवढी आहे. एकूणच अब्जाधीश वाढले व संपत्तीही वाढली. पैशापाशी पैसा जातो असे म्हटले जाते ते ही यादी पाहिल्यावर अगदी सार्थ वाटते. जशी जशी संपत्ती वाढते तशी तशी ती काही प्रमाणात तरी जनतेच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे. त्यातच खरे संपत्तीचे महत्व आहे. गरिबांना योग्य ती मदत दिल्यास त्यांचे आशीर्वाद या अब्जाधीशांना निश्चित मिळतील. भारतातील अब्जाधीश हे करतही आहेत ही समाधानाची बाब आहे.

**- शांताराम वाघ**, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**पाच एप्रिल**

**१८५४:-** ग्रंथकार, संपादक सुब्राय लक्ष्मण नाईक यांचा जन्म. 'भीष्मप्रतिज्ञा' हे त्यांचे नाटक. भारतीय संस्कृती आणि तिची महानता स्पष्ट करते. संन्यास घेतल्यावर त्यांनी आपल्यासमोरील कार्य 'त्रिमितीपन्यास' हे माधव, रामानुज व शंकर इत्यादींचे तत्वज्ञान सांगणारे पुस्तक लिहून पुढे चालविले. 'गीतारहस्य' ह्या पुस्तकातून त्यांनी टिळकांनी कर्मयोगाला इतरही मार्गांनी जोड दयावी असे प्रतिपादन केले. तथापि त्यांची महत्त्वपूर्ण साहित्यिक कामगिरी वृत्तपत्रीय कामगिरीमुळे बहरली. 'गोवामित्र' हे मासिक आणि 'गोवात्मा' हे साप्ताहिक त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चालवले. यातून विविध टोपण नावांनी विविध प्रकारचे लेखन त्यांनी केले. **१८७७ :-** 'रामायण लंकेचा शोध, मोहंजोदडो संस्कृतीच्या नाशाची कारणेफ असे महत्त्वाचे लेख आणि संस्थानांचा साद्यंत इतिहास लिहिणारे माधवराव विनायक किबे उर्फ सरदार किबे यांचा जन्म. १९२६ साली मुंबईत भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला होता. **१८९०:-** 'आनंद कंद ऐसा, हा हिंद देश माझा' या गाजलेल्या कवितेचे कर्ते आनंद कृष्णाजी टेकाडे यांचा जन्म. **१८९२:-** 'निर्णयसागर छापखान्या'चे जनक आणि स्वत:च्या फाउंड्रीत टॅक तयार करुन मराठीतील मुद्रणयुग जनसामान्यांपर्यंत नेणारे जावजी दादाजी चौधरी यांचे निधन. **१८९२:-** लेखक, पेशाने स्थापत्य अभियांत्रिक रामचंद्र विनायक मराठे यांचा जन्म. ह्यांनी 'इंग्रजी-मराठी पुरातत्त्व कोश' मधून पुरातत्त्वविषयक चार हजार शब्दांचा सचित्र कोश तसेच 'इंग्रजी-मराठी स्थापत्य शिल्पकोश' हा स्थापत्य व शिल्पविषयक पारिभाषिक प्रतिशब्द कोश अशी साहित्य संपदा. **१९०५:-** कोणाचाही मुलाहिजा न बाळगता निर्भीडपणा टिकवणारे 'भाला' हे पत्र भास्कर बळवंत भोपटकर (भालाकार) यांनी या दिवशी सुरु केले आणि लिखाण या इतरांच्या लेखनापायी प्रसंगी तुरुंगवास भोगून जवळपास दोन दशके चालविले. **१९१०:-** लेखक, ॲड.गोविंद सदाशिव फडके यांचा जन्म. ह्यांचे 'आत्माराम रमापती' हे चरित्र तर 'गीत गौरीहर महिम्न्' हे कुमारसंभवावर आधारित आख्यान, 'रामचरित चंद्रिका' हे ओवीबध्द काव्य आणि 'दत्तावतार', 'सर, मी तुमचा आहे असे म्हणा' हे नाटक अशी साहित्य संपदा. **१९११:-** कथा, चित्रपट परिक्षणे, लेख आदी स्वरुपाचे लेखन मनोहर, केसरी, अमृत आदीमधून लेखन करणारे रंगनाथ कृष्ण चिंचलीकर यांचा जन्म. ह्यांची 'कुरुक्षेत्र' ही महाभारतावर,'मराठ्यातील दुही' ही संताजी घोरे वरील पटकथा तसेच 'बिंदू कथा' ही लघुकथा, 'मेवामिठाई' हा विनोदी लेखसंग्रह आणि 'हिरवळ व रस्ता' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९२२:-** रमाबाई बिपिन मेधावी तथा पंडिता रमाबाई यांचे निधन. वेदशास्त्रसंपन्न अनंतशास्त्री डोंगरे यांच्या कन्या. वैधव्यानंतर ख्रिस्ती धर्म स्विकारल्याने त्या काळात मोठे वादळ निर्माण झाले. 'स्त्री-धर्म-नीती' हे पहिले पुस्तक. याशिवाय पंडिता रमाबाई यांचा 'इंग्लंडचा प्रवास आणि युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती आणि प्रवासवृत्त' ही त्यांची महत्त्वपूर्ण पुस्तके. अखेरच्या काळात ख्रिस्ती धर्माशी निगडित लेखन. त्यात ख्रिस्ताच्या चरित्राचा समावेश आहे. **१९२३:-** संपादक, कथाकार शांताबाई मुकुंद किर्लोस्कर यांचा जन्म. 'डाक्क्याची साडी', 'शोध (कथासंग्रह), भातुकली (कांदबरी), बालसंगोपनावरील दोन पुस्तके व 'गोष्ट पासष्टीची' ही त्यांची साहित्यसंपदा. याशिवाय किर्लोस्कर, स्त्री, मनोहर' या मासिकाच्या आणि 'पालक-शिक्षण' या त्रैमासिकाचे संपादक पद त्यांनी भुषवले आहे. 'प्रकाशाचा वेध' हे किर्लोस्कर मासिकाच्या संपादकीय स्फूट लेखांचा संग्रह तसेच 'बायकांचा जन्म' हे अनुवादीत पुस्तक ही त्यांची अन्य साहित्यसंपदा. **१९३०:-** 'रामनगरी' या आपल्या आत्मचरित्राद्वारे मराठी साहित्यविश्वात आपला ठसा उमटवणारे विनोदी अभिनेते राम नगरकर यांचा जन्म. **१९३५:-** लेखक, योगशास्त्राचे अभ्यासक, पेशाने होमिओपॅथी डॉक्टर रमेश विष्णू रानडे यांचा जन्म. ह्यांचा 'औषधे कणभर', 'होमिओपॅथीची पायवाट' हे होमिओपॅथीची महती सांगणारे ग्रंथ प्रसिध्द. **१९३९:-** लेखक, पत्रकार, 'दैनिक सांज'चे संपादक सीताराम नीलकंठ कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांनी अक्कलकोट स्वामींवर ग्रंथ रचना केली. याशिवाय 'भारतातील २१ तीर्थक्षेत्रे', 'महाराज सुपुत्र हे बालसाहित्य, 'विश्वमाऊली ज्ञानेश्वर' अशी साहित्य संपदा. **१९४०:-** साहित्य आणि चित्रकला या दोहोंवर आपला ठसा उमटवणाऱ्या वासंती अरुण मुजुमदार यांचा जन्म. चित्रकला, संगीत या कलांच्या जाणकारीने त्यांच्या काव्याला शब्दकलेचे विशेष सौंदर्य प्राप्त झाले. 'सहेला रे', 'सनेही' हे काव्यसंग्रह. 'नदीकाठी' हा ललित लेखसंग्रह तसेच काही ग्रंथाचे संपादन त्यांनी केले. **१९४२:-** कविता, ललित लेख, समीक्षा आदी स्वरुपाचे लेखन करणारे लेखक प्रा. मधुकर सीताराम जामकर यांचा जन्म. यांचे 'पालवी' हा सौंदर्यशोधन आणि तत्त्वचिंतनपर लघुनिबंध. 'रखमा' ही प्रदीर्घकथा आणि 'क्षितीज' हा काव्यसंग्रह अशी साहित्यसंपदा. **१९५४:-** कवयित्री अनुराधा कौतिकराव पाटील यांचा जन्म. 'दिगंत', 'तरीही', 'दिवसेंदिवस' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित. **१९७६:-** संस्कृततज्ञ आणि व्याकरणतज्ञ वासुदेव गोपाळ परांजपे यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# तळ्यात गीतेंच्या सभेला प्रचंड गर्दी




**। तळा । वार्ताहर ।**

इंडिया आघाडीने शिवसेना ठाकरे गटाचे अनंत गीते यांच्या उमेद्वारीवर शिक्कामोर्तब केले आहे तर लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सुनील तटकरे यांची उमेद्वारी जाहीर झाली आहे. त्यामुळे या दोघांमध्येच खरी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. (दि.७) मे निवडणूक पार पडणार आहे. त्या आधी आता निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. इंडिया आघाडीचे गीते यांनी रायगड येथून संवाद यात्रेची सुरुवात केली आहे. संवाद यात्रा तळा तालुक्यातील बोरघर येथे पार पडली. या संवाद यात्रेला तळा तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील मतदारांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात गीते यांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची झोप उडाली आहे. रायगड लोकसभा मतदार संघामध्ये शिवसेनेचे अनंत गीते विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांच्यामध्ये सरळ लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. समाजमाध्यमांवर या दोन्ही नेत्यांचे फोटो झळकत असून यांच्यामध्ये काटे की टक्कर होणार असे मेसेज व्हायरल होत आहेत. आता प्रत्यक्षात निवडणूक प्रचाराला सुरुवात झाली आहे अनंत गीते यांच्या संवाद दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे तळा तालुका हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आहे या बालेकिल्ल्यात बोरघर येथे संवाद दौरा सभा घेण्याचे धाडस तळा तालुका पदाधिकारी यांनी केले आणि त्यांना यश आले कमी वेळेत तळा शहर आणि ग्रामीण भागातील मतदारांनी मोठ्या संख्येने गर्दी केली तळा तालुका प्रमुख नितीन साळवी यांनी चांगल्या प्रकारे या दौऱ्याचे नियोजन केले. अनिल नवगणे यांनी इंडिया आघाडीचे अनंत गीते हे तटकरेंचा पराभव करतील आणि निवडून येतील असा विश्वास यावेळी व्यक्त केला. गत निवडणुकीत चुकीच्या माणसाला आपण निवडून दिले, ही चूक सुधारण्याची वेळ आली आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी ठाकरे गटाचे अनिल नवगणे, संजय कदम, खेड दापोलीचे माजी आ. संजय कदम, बंटी पोटफोडे, माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, महाड विधानसभा नेते नाना जगताप, स्वीटी गिरासे, शेकापचे तालुका चिटणीस रमेश मोरे, गजानन अधिकारी, नंदु शिर्के, नितीन साळवी आदी मान्यवर उपस्थित होते.



# शिंदे गटाच्या आमदारांमध्ये अस्वस्थता

## भाजपच्या दबावामुळे उमेदवारी मिळण्याबाबत साशंकता

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भाजपच्या दबावामुळे तीन खासदारांना उमेदवारी नाकारण्यात आल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत याचेच पडसाद उमटून उमेद्वारी नाकारली जाईल, अशी भीती शिंदे गटाच्या आमदारांमध्ये पसरली आहे. पक्षाच्या आमदारांमध्ये अशीच चलबिचल सुरू राहिल्यास शिंदे यांच्यासाठी ही बाब त्रासदायक ठरू शकते. शिंदे यांनी भाजपच्या दबावाला बळी पडू नये, अशी भूमिका पक्षातील नेत्यांकडून मांडली जात आहे.



भाजपच्या दबावामुळे हिंगोलीत खा. हेमंत पाटील यांनी जाहीर झालेली उमेद्वारी रद्द करण्यात आली. खा. पाटील यांची उमेद्वारी दोन आठवड्यांपूर्वी जाहीर करण्यात आली होती. पण पाटील उमेद्वार असल्यास निवडून येणार नाहीत, असे भाजप नेत्यांनी सर्वेक्षणाच्या आकडेवारीच्या आधारे लक्षात आणून दिल्यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी यांची उमेदवारी रद्द केली. रामटेकमध्येही भाजपच्या दबावामुळे काँग्रेसच्या आमदाराला उमेद्वारी देण्याची वेळ शिंदे यांच्यावर आली. यवतमाळ-वाशीमध्ये भावना गवळी यांनाही उमेद्वारी नाकारण्यात आली.

शिवसेनेतील फुटीनंतर १८ पैकी १३ खासदारांनी शिंदे यांना साथ दिली होती. यापैकी तीन विद्यमान खासदारांना शिंदे यांनी उमेद्वारी नाकारली आहे. लोकसभेसाठी मोठे मतदारसंघ असताना भाजपच्या दबावापुढे शिंदे झुकले. यामुळेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या वेळी काय होईल, अशी भीती आमदारांना सतावू लागली आहे.

> लोकसभा निवडणुकीत पक्षाने काही विद्यमान खासदारांना उमेदवारी नाकारली असली तरी त्यांचे योग्य ते राजकीय पुनर्वसन करण्याची हमी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. शिंदे कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाहीत. शिवसेनेत शिंदे यांना साथ देणाऱ्या सर्व आमदारांना पुन्हा उमेदवारी मिळण्यात काहीच अडचण येणार नाही. पक्षाच्या आमदारांचा शिंदे यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास आहे.
> –भरत गोगावले, आमदार शिंदे गट

## बंडखोराने वाढवले टेंशन

**हिंगोली :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती समोर बंडखोरांचं मोठं आव्हान निर्माण झालं आहे. याचा पहिला धक्का भाजपला हिंगोली मतदारसंघात बसला आहे. पाटील यांना जाहीर केलेली उमेद्वारी मागे घेण्याची नामुष्की शिंदे यांच्यावर ओढवली आहे. त्यांच्याऐवजी बाबूराव कदम कोहळीकर यांना तिकीट देण्यात आलं. यामुळे पाटील नाराज झाले. भाजपाचे स्थानिक पदाधिकारी राम दास पाटील यांनीही अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महायुतीसमोर बंडखोरांचे बंड थंड करण्याचं मोठं आव्हान असणार आहे.

## वधू-वरांना मतदानाची शपथ

**पुणे :** पुणेकर प्रत्येक गोष्टीसंदर्भात वेगळेच असतात. नवनवीन चांगल्या प्रथा राबवण्यात देशात पुणेकरांची आघाडी असते. लोकसभा निवडणुकीत जनजागृतीचा अनोखा फंडा पुणे शहरातील वधू-वरांनी राबवला. आंबगाव तालुक्यातील जवळे गावात अक्षय लोखंडे आणि उत्कर्षा घोडेकर यांच्या विवाह झाला. याविवाहाची तयारी सुरू असताना नवरदेवाची स्वारीही आली. यावेळी वरातीत मतदान करण्याचा संकल्प करण्यात आलेले बॅनर्स होते.

## अर्चना पाटलांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**धाराशिव :** अर्चना पाटील यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाची चर्चा सुरू होती. पाटील यांच्या पक्षप्रवेशाला काही जणांचा विरोध होता. त्यामुळे पक्षप्रवेश रखडला होता. अखेर पाटील यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाला मुहूर्त मिळालाआणिराष्ट्रवादीमध्येप्रवेश केला. मुंबई येथील राष्ट्रवादीच्या कार्यालयात अजित पवारांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश केला. अर्चना पाटील या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून घड्याळ या चिन्हावर धाराशिवची लोकसभा निवडणूक लढवणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान राष्ट्रवादीकडून पाटील या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास धाराशिवमध्ये दीर आणि भावजईमध्ये हाय होल्टेज लढत होण्याची शक्यता आहे.

## रश्मी बर्वेंना दणका

**रामटेक :** लोकसभा निवडणुकीसाठी प्रचार आणि शक्तीप्रदर्शनं जोरदार सुरू झाली आहे. प्रत्येक पक्षाने कंबर कसली आहे. तर दुसरीकडे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या रामटेकमधील उमेदवार असलेल्या रश्मी बर्वे यांना मोठा दणका बसला आहे. रामटेकमधील काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांना लोकसभा निवडणूक लढवता येणार नाही. रश्मी बर्वे यांच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र रद्द केल्याच्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे.

# माढ्यात मोहिते पाटलांना उमेदवारीची शक्यता

**। माढा । वृत्तसंस्था ।**

माढा लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून नाराज असणारे धैर्यशील मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वे सर्वा शरद पवारांची भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. शरद पवारांच्या मुंबईतील निवासस्थान सिल्वर ओकवर जाऊन धैर्यशील मोहिते पाटलांनी पवारांची भेट घेतली. त्यामुळे आता मोहिते पाटील भाजपला लवकरच 'दे धक्का' देणार हे निश्चित झाल्याच्या चर्चा सध्या सुरू आहेत.



मोहित पाटील आणि पवारांच्या भेटीत माढा लोकसभा निवडणुकीबाबत खलबतं झाल्याची माहिती मिळत आहे. तसेच, येत्या १३ तारखेला धैर्यशील मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाच्या दिवशी मोठे शक्तिप्रदर्शन करणार असल्याचे बोलले जात असून याच दिवशी ते आपली उमेद्वारी दाखल करण्याच्या हालचाली सुरू आहेत.

मोहिते पाटील यांनी २०१९ मध्ये भाजपत प्रवेश करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर विराट शक्ती प्रदर्शन करत भाजपमध्ये प्रवेश केला होता. यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात असणारी माढा लोकसभा भाजपाला जिंकून दिली होती.

आता पुन्हा एकदा राष्ट्रवादीत प्रवेश केल्यावर शरद पवार आणि आघाडीच्या नेत्यांसमोर मोठं शक्तिप्रदर्शन करत शेतकरी मेळावा घेण्याचं नियोजन देखील सुरु झालं आहे. मोहिते पाटील यांना करमाळा येथून माजी आमदार नारायण आबा पाटील यांच्यासह इतर तालुक्यातूनही मोठं समर्थन मिळू लागलं आहे. आता मोहिते पाटील यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाचा निर्णय शरद पवार केव्हा जाहीर करणार? त्यानंतर या सर्व घडामोडींना वेग येणार आहे.

# सिंधुदुर्गात राणेंचा प्रचार सुरू

## शिवसेनेचा अजूनही मतदारसंघावर दावा

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

सिंधुदुर्ग-रत्नागिरी मतदारसंघातील उमेद्वारी अजून निश्चितझालेलीनाही. या मतदारसंघावर आजही शिवसेनेचाच दावा आहे. त्यामुळे या मतदारसंघातील उमेद्वारी ही निश्चितपणे शिवसेनेलाच मिळेल, असा दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. मतदानाला अवघे ३४ दिवस बाकी असून मतदारसंघात भाजपा, शिवसेना शिंदे गट यांच्याकडून कोणतीही उमेद्वारी घोषित करण्यात आलेली नाही. तरी बुधवारी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाजपाने सुरुवातीला कोर कमिटीची बैठक घेण्यात आली. त्यानंतर महायुतीची



समन्वय समितीची बैठक होणार होती. मात्र, मंत्री उदय सामंत सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर असूनसुद्धा त्यांनी या महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीला हजेरी लावली नाही.

सिंधुदुर्ग-रत्नागिरी मतदार संघातील उमेदवारी अजून निश्चित झालेली नाही. या मतदारसंघावर आजही शिवसेनेचाच दावा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळमध्ये शिवसेना आणि भाजपाची समन्वय समितीची बैठक होती.

मात्र, या बैठकीला उदय सामंत हे उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी राणे यांच्याशी बंद खोलीत चर्चा केली आणि ते मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. त्यामुळे या मतदारसंघातील उमेद्वारीचा तिढा अजून कायम आहे. दरम्यान, किरण सामंत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून रात्री उशिरा आपण माघार घेत असल्याचं स्टेटस ठेवले होते. मात्र, कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर ते स्टेटस काढले. अजूनही आमची आशा आहे की, हा मतदारसंघ निश्चितपणे शिवसेनेकडेच राहील अशा पद्धतीचा दावा सुद्धा उदय सामंत यांनी केला आहे.

महायुतीकडून उमेद्वारी जरी जाहीर झाली नसली तरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपाच्या वतीने राणे यांच्या उपस्थितीत संघटनात्मक आढावा बैठक घेण्यात आली. यामुळे भाजपाने सिंधुदुर्ग-रत्नागिरी मतदारसंघावर आपला प्रबळ दावा ठोकला आहे.

# ६५ गावांचा निवडणुकीवर बहिष्कार

**। संभाजीनगर । वृत्तसंस्था ।**

राज्यात लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून सर्वच पक्षांनी निवडणुकीचे मैदान मारण्यासाठी जय्यत तयारी सुरू केली आहे. राज्यभरातील सर्वच जिल्ह्यांमध्ये निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणूक आयोगाकडून अधिकाधिक मतदान करण्यासाठी मतदारांना वेळोवेळी आवाहन केले जात आहे. तर अनेक उपाययोजनाही राबवल्या जात आहेत. मात्र, असे असले तरीदेखील राज्यातील वेगवेगळ्या लोकसभा मतदारसंघांमधील मतदारांनी आपल्या मागण्यांसाठी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यात तब्बल ६५ गावातील ४१ हजार ४४० मतदारांनी लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे, माढा आणि बारामती लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक मतदारांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला आहे. रस्ते, पाणी, मराठा आरक्षण, रेल्वे गाडी सुरू करावी यासह बीड जिल्ह्यातील एका गावानं तर चक्क त्यांच्या गावातील मोबाईल टॉवरसाठी निवडणुकीवर बहिष्कार टाकणार असल्याचं जाहीर केले आहे.

# आघाडीच्या उमेदवाराचा गावदौरा

**। रसायनी । वार्ताहर ।**

मावळ मतदारसंघातील महाविकास आघाडीचे शिवसेना ठाकरे गटाचे मावळ लोकसभा उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांनी निवडणूक प्रचाराला सुरुवात करण्याअगोदर गावभेठी दौरा सुरु केला आहे. खऱ्या अर्थाने प्रचाराला सुरुवात केल्याचे पहायला मिळत आहे. वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील नढाल येथील जागृत देवस्थान कळंबा देवीचे दर्शन घेवून श्रीफळ वाढवून नढाळहून गावभेठी प्रचाराला सुरुवात केली.तेथून वरोसे समाज मंदिर, लोधिवली, रिस गाव, कांबे गाव, रिसवाडी येथे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.यानंतर तळेगाव वाडी, तळेगाव, पानशिल गाव, मोहोपाडा आदीवासीवाडी, चांभार्ली गाव, दुर्गामाता कॉलनी, खाने आंबिवली, आळी आंबिवली, नविन पोसरी, मोहोपाडा बाजारपेठेतून शिवाजी चौकात महाराजांना अभिवादन करुन सभेच्या माध्यमातून सांगता करण्यात आली.



यावेळीआघाडीचेसर्वपदाधिकारी उपस्थित होते. गद्दारांना गद्दारी काय असते याचा धडा शिकविण्यासाठी आघाडीचे सामान्य मतदार सज्ज झाला असून आता त्यांच्या पराभवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी वाट पहावी लागणार असल्याचे वाघेरे-पाटील यांनी सांगितले.

# अर्ज दाखल करण्यापूर्वी माकडाची एन्ट्री

**। हिंगोली । वृत्तसंस्था ।**

हिंगोलीतील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार बी. डी. चव्हाण आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

चव्हाण आपला लोकसभेचा अर्ज दाखल करण्यापूर्वी नांदेडच्या निवासस्थानी औक्षण करण्यात आले. दरम्यान, चव्हाण यांचे औक्षण सुरू असताना तिथे एका माकडाने एन्ट्री घेतली.



यावेळीचव्हाणयांनीमाकडाला खाण्यास देऊन त्यांचे दर्शन घेतले. या घटनेचा व्हिडीओचा चव्हाण यांच्या मतदारसंघात चांगलाच व्हायरल होत आहे.

वंचितकडून हिंगोली लोकसभेसाठी चव्हाण यांना उमेदवारी दिल्यानंतर नांदेड येथील चव्हाण यांच्या घरासमोर कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केल्याचे पाहायला मिळाले होते.

# हिंगोलीचा उमेदवार बदलण्याची शिंदे गटावर नामुष्की

**। हिंगोली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीच्या हिंगोलीचा जाहीर उमेदवार बदलण्याची नामुष्की शिवसेनेवर (शिंदे गट) आली आहे. हेमंत पाटील यांच्याऐवजी बाबुराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हेमंत पाटील यांच्या नावाला स्थानिक विरोध असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवसेनेची पहिली यादी जाहीर झाली होती. या यादीमध्ये विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी घोषित करण्यात आली होती. मात्र भाजपचा दबाव होता. त्यामुळे हिंगोलीचा जाहीर उमेदवार



करत आहे. हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र भाजने केलेल्या सर्व्हेनुसार हेमंट पाटील यांच्या नावाला विरोध होता. भाजप देखील उमेदवार बदलण्यासाठी आग्रही होते.

हेमंत पाटील यांचे कार्यकर्ते काल आक्रमक झाले होते. वर्षा निवासस्थानी त्यांनी मोर्चा देखील काढला होता. रस्सा रोको देखील करण्यात आला. मात्र तरी देखील आज शिंदे गटाने हेमंत पाटील यांचे तिकीट रद्द केले आहे.बाबुराव कमद म्हणाले, चार दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला मुंबईला बोलावले होते. लोकसभा निवडणुकीची उमेदवारी अर्ज भरण्याची तयारी सुरु करा, असे मुख्यमंत्री म्हणाले होते. हेमंत पाटील यांच्याशी माझं बोलण झालं आहे. त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणार आहे.मात्र यवतमाळ-वाशिम मतदारसंघातून हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना उमेदवारी देण्याची आली आहे. त्यामुळे पाटील यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

# परभणीत जाधव विरुद्ध जानकर

**परभणी :** शिवसेनेची ३०-३२ वर्षापासून एकहाती सत्ता असलेल्या लोकसभेच्या परभणी मतदारसंघात यंदा उद्धव ठाकरे गटाच्या संजय जाधव यांना शह देण्यासाठी महायुतीने राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांना निवडणूक रिंगणात उतरविले आहे. या दोन्ही प्रमुख उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आता जाधव विरुद्ध जानकर लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. महायुतीने जाधवांविरुद्ध महादेवास्त्र प्रभावी ठरते का, हा सध्या चर्चेचा विषय आहे.

# उन्मेश पाटलांच्या प्रवेशाने समीकरणे बदलणार

**। जळगाव । वृत्तसंस्था ।**

लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी नाकारल्यानंतर बुधवारी उन्मेश पाटील यांनी खासदारकीचा राजीनामा देत शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. त्याचे जळगाव जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात पडसाद उमटत असताना जळगाव मतदारसंघातून सुरुवातीला स्मिता वाघांना सोपी वाटणारी निवडणूक कठीण झाल्याचे व भाजप-मविआत 'काटे की टक्कर' होणार असल्याचे मानले जात आहे.

दोन आठवड्यांपूर्वी भाजपने जळगाव जिल्ह्यातील दोन्ही जळगाव व रावेर लोकसभा मतदारसंघातून अनुक्रमे स्मिता वाघ व रक्षा खडसे



यांना उमेदवारी जाहीर केली. भाजपच्या उमेद्वारांची घोषणा होऊन दोन आठवडे उलटल्यानंतरही मविआचे या दोन्ही मतदारसंघातील उमेदवार जाहीर होत नव्हते.जळगाव लोकसभा मतदारसंघात मविआला व ही जागा शिवसेना ठाकरे गटाकडे असल्याने त्यांना उमेदवार शोधावा लागत होता. काही नावांवर चर्चाही झाली, मात्र योग्य व सक्षम नाव समोर येत नव्हते. उन्मेश पाटील यांना उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांची भूमिका काय, हेदेखील समजू शकत नव्हते. त्यामुळे जळगाव मतदारसंघात स्मिता वाघांसमोर उमेदवारही मिळत नाही म्हणून ही निवडणूक एकतर्फी होईल का, अशी चर्चाही सुरु झाली होती.

उन्मेश पाटील यांनी ठाकरे गटात प्रवेश करीत शिवबंधन हाती बांधले. त्यांच्यासोबत पारोळ्याचे माजी नगराध्यक्ष करण पवार यांनीही ठाकरे गटात प्रवेश केल्यानंतर उद्धव ठाकरेंनी बुधवारीचकरणपवारांच्याउमेदवारीवर शिक्कामोर्तब केले.त्यामुळे आता जळगाव लोकसभेतील समीकरणे बदलली आहेत.

# अन्याय सहन केलात, आता लढायला सज्ज व्हा!

## राजन विचारे यांचं भावनिक आवाहन

**। ठाणे । वृत्तसंस्था।**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार पाडले आणि ठाण्यातील आपल्या शाखा काबीज करण्याचे काम या मंडळींने केले. शिवसेनेसाठी वर्षानुवर्षे राबलेल्या महिला आघाडीतील एका कार्यकर्तीचे झुणका भाकर केंद्र होते. धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी ते तिला दिले होते. ती उद्धव ठाकरेंची साथ सोडत नाही हे पाहून हे झुणका भाकर केंद्र या मंडळींनी पाडायला लावले. पालांडे नावाचे माजी सैनिक असलेल्या एका माजी नगरसेवकाच्या मुलाच्या सोनोग्राफी केंद्राला नोटीस बजावली. इतका अन्याय सहन करुनही आपण लढत राहीलो. अन्याय सहन केलात आता पेटून उठा त्यांना जागा दाखविण्याची वेळ आली आहे, असे




भावनिक आवाहन ठाणे लोकसभेचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार राजन विचारे यांनी ठाण्यातील सावरकरनगर भागात प्रचाराचा शुभारंभ करताना केले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

ठाण्यातील कोकण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावरकरनगर, लोकमान्यनगर भागात महाविकास आघाडीच्या कार्यकर्ते तसेच पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना विचारे यांनी उपस्थितांना आणि विशेषत: पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना दिघे साहेबांचे आशिर्वाद आपल्या मागे आहेत, निर्धास्त रहा असे भावनिक आवाहन केले. ज्या महिलेला उदरनिर्वाहासाठी दिघे साहेबांनी झुणका भाकर केंद्र देऊ केले, ती महिला तुमच्या गटात सहभागी होत नाही म्हणून एका रात्रीत तिचे केंद्र पाडले. पालांडे नावाचे पंच्याहत्तरी गाठलेले माजी नगरसेवक आहेत. माजी सैनिक म्हणून या व्यक्तीला ठाण्यातील राजकीय वर्तुळात आदराचे स्थान आहे. या वयात पक्ष कसा सोडायचा या विवंचनेत असल्याने ते आहेत तेथेच राहू या भूमीकेत होते. त्यांच्या मुलाचे सोनोग्राफी केंद्र आहे. जागा भाड्याने घेऊन त्यांच्या डॉक्टर मुलाने ते सुरु केले होते. या केंद्राला नोटीस बजावून त्यांना धमकाविण्यात आले. दिघे साहेबांच्या काळात मोठया प्रयत्नांनी उभ्या केलेल्या एकएक शाखा यांनी बळजबरीने ताब्यात घेतल्या. जुन्या शाखा गेल्या खिशातील पैसे टाकून वस्त्यावस्त्यांमधून नव्या शाखा उभ्या केल्या. सगळच पैशाने विकत घेता येत नाही, निष्ठा नावाची काही चिज असते की नाही, असा घणाघात विचारे यांनी यावेळी केला.

# संजय निरुपमांवर शिस्तभंगाची कारवाई

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

संजय निरुपम यांचा काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या यादीत समाविष्ट करण्यात आला होता. मात्र, निरुपम यांनी पक्षविरोधी विधाने करीत, पक्ष सोडण्याचे संकेत यापूर्वीच दिले होते. या पार्श्वभूमीवर निरुपम यांचे नाव काँग्रेसने स्टार प्रचारकांच्या यादीतून हटवले आहे. तसेच त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जाहीर केले आहे.



तसेच मित्र पक्षाच्या उमेद्वाराच्या विरोधात सातत्याने टीका करत असल्याने काँग्रेस आता संजय निरुपम यांच्यावर थेट पक्षशिस्तभंगाची कारवाई करण्याचे ठरविले आहे. निरुपम कुणाची तरी सुपारी घेऊन वक्तव्य करत आहेत, त्यामुळे कोणतीही नोटीस न बजावता त्यांच्यावर थेट शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले.

**निवडक**

## पिकअप गाडीची चोरी

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील सोमाटणे येथे दुकाना शेजारी उभी करून ठेवलेल्या महिंद्रा बोलेरो पिकअप गाडीची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रफिक खान यांनी त्यांची १,६०,०००/- किमतीची सफेद रंगाची महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एम एच ४६ ई ५४२३ ही दुकाना शेजारी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कारच्या धडकेत मृत्यू

**रसायनी :** मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर रिस गावाच्या हद्दीत झालेल्या कारच्या अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे. हा अपघात मध्यरात्रीच्या सुमारास घडला. मुंबई-पुणे एक्सप्रेसवर कारचालक हलगर्जीपणाने गाडी चालवून रस्ता दुरूस्तीचे काम चालू असताना तेथे लावण्यात आलेल्या लोखंडी बॅरीकेटला धडकला. यात तेथुन जाणाऱ्या रघुवीर हलकाई याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पनवेलमध्ये दुचाकीचा अपघात

**पनवेल :** कळंबोली सर्कलयेथून पनवेल येथे जाणाऱ्या भरधाव स्कुटीची खांदा कॉलनी येथील उड्डाणपुलाच्या कठड्याला धडकल्याने अपघाताची घटना घडली. या अपघातात स्कुटीचालकाचा मृत्यू झाला असून सहकारी गंभीर जखमी झाला आहे. खांदेश्वर पोलिसांनी स्कुटी चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव प्रवीण पळसमकर (२७) असे असून जखमी झालेल्या त्याच्या सहकाऱ्याचे नाव अविनाश जोगळे (२९) असे आहे.

## पायरोटास्क एनर्जी कंपनीत आग

**खोपोली :** खालापूर तालुक्यातील ताकई-अडोशी ढेकू गावाजवळ असलेल्या पायरोटास्क एनर्जी कपंनीत आग लागून कंपनीतील मशीन आणि कच्चा माल पूर्णतः जळून खाक झाला आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. खोपोली अग्निशमन दल, टाटा स्टील अग्निशमन दल, आलाना अग्नी शमन दल, जेएसडब्लू अग्निशमनदल तसेच खोपोली पोलीस स्टेशनचे अधिकारी त्वरित घटनास्थळी पोहचून दोन तासाच्या अथक प्रयत्नातून आग नियंत्रणात आणण्यात यश आले.

## ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन

**महाड :** श्री वारकरी संत सेवा मंडळाच्या वतीने ५ ते ७ एप्रिल या कालावधीमध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाचे पारायण व अखंड हरिनाम यज्ञ पार पडणार आहे. या नामयज्ञांमध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकारयांची कीर्तने, प्रवचन, काकड आरती, असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महाड येथील श्री वीरेश्वर महाराज मंदिरामध्ये हा कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी वीरेश्वर महाराज अभिषेक, ध्वजारोहण, घटस्थापनेने सुरुवात केली जाणार आहे.

# पोलादपूरातील बहुचर्चित पुलांची पुनर्बांधणी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**२००९ ची लोकसभा आणि त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीमध्ये या वादग्रस्त कापडे-कामथे-बोरघर पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या श्रेयवादाची आणि भ्रष्टाचाराची चर्चा सुरू होती. २०२१ च्या अतिवृष्टी, महापूर आणि भुस्खंलनावेळी या पुलांच्या अ‍ॅप्रोच रोडला मोठ्या प्रामाणात माती व झाडोऱ्याच्या प्रवाहाचे दणके बसून अ‍ॅप्रोच रोड वाहून गेल्याने हे पुल कमकुवत झाल्याची चर्चा सुरू झाली. तर आज मंजूर झालेले दोन नवीन पुल प्रवाहाचे दणके बसू शकतील, त्याच बाजूला बांधण्यात येत असल्याने दोन्ही पुलांनादेखील तशाच प्रकारचा धोका असल्याबाबतची चर्चा सुरू आहे.**

पोलादपूर तालुक्यातील बहुचर्चित कापडे-कामथे-बोरघर या पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ २००८ रोजी तत्कालीन खासदारांच्या हस्ते झाल्यानंतर या कामाच्या विविध त्रूटी व चुका तसेच भ्रष्टाचाराच्या चर्चा होऊन अनेकदा या कामात बदल झाला. सरतेशेवटी कापडे-कामथे-बोरघर अशी पंतप्रधान ग्रामसडक योजनेचा विस्तार होऊन काही ठिकाणी नव्याने पुलांची बांधणी झाली. या योजनेचे राज्याचे तत्कालीन मुख्य अभियंता सी.डी.फकीर यांनी पुणे येथील राज्याच्या विशेष गुणवत्ता नियंत्रकांमार्फत रस्त्याच्या दर्जाची चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना जारी केल्या. या आदेशाचे पत्र राज्याचे मुख्य अभियंता कार्यालयातून जारी झाले. यामुळे या रस्त्याचे ठेकेदार आर.के.चंदानी आणि अभियंता आंबटकर यांचे धाबे दणाणले.



कापडे ते कामथे या योजनेतील रस्ता जागोजागी उखडल्याबाबत वृत्तपत्रांनी थेट या रस्त्यासाठी पाठपुरावा करणारे माहितीचा अधिकाराचे कार्यकर्ते रमेश मालुसरे यांचे आरोप प्रसिद्धीस दिले. यानंतर योजनेच्या एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर रिताली बारमदे यांनी वेळोवेळी ठेकेदार आर.के.चंदानी कन्स्ट्रक्शन्स कंपनी उल्हासनगर यांना नोटीसा बजावल्या. मात्र, राजकीय हितसंबंध जोपासून पोलादपूर तालुक्यात निकृष्ट कामे करणाऱ्या या ठेकेदार कंपनीने या नोटीसांना भीक घातली नव्हती. शेवटी ठेकेदाराच्या अनामत रक्कमेतून निविदा काढून अन्य ठेकेदारांकडून हे काम पूर्ण करण्याचा इशारा दिला. मात्र, तोपर्यंत पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या कापडे ते कामथे रस्त्याची एकूण १८.६०० कि.मी. लांबी असून खास दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत ६४.३० लाख रूपयांचा निधी उपलब्ध होऊन या रस्त्यावरील खड्डे दुरूस्तीचे कामास सुरूवात करण्यात आली. त्यानंतर राजकीय गुलदस्त्यातच चौकशी दडल्याने पुढे काहीही निष्पन्न झाले नाही.

२०२१ मध्ये अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनामुळे या रस्त्यावरील दोन पुलांना जोरदार हादरे बसून पुल कमकुवत झाल्याची चर्चा झाली. मात्र, प्रत्यक्षात या पुलांच्या दुतर्फा अ‍ॅप्रोच रोडच्या कॉलर्स भुस्खलनात वाहून आलेल्या राडारोड्यामुळे तडकल्याने या पुलांना आंबेनळी घाटाकडे जाणाऱ्या महाबळेश्वर रस्त्यावरील पुल आणि मोऱ्यांप्रमाणे काँक्रीट जॅकेट करून मजबुतीकरणाची गरज असताना या पुलांवर ज्याबाजूने भुस्खंलनाचा आणि महापुराचा मारा झाला. त्याच बाजूला नवीन पुलांचे बांधकाम करण्यासाठी कापडे पितळवाडी बोरघर कामथे रस्ता प्रजिमा १०१ च्या ५-१००वरील मोठ्या पुलाचे बांधकाम करणे आणि प्रजिमा १०१ च्या ५-५०० वरील मोठ्या पुलाचे बांधकाम करणे या कामांचा भुमिपूजन सोहळा सावित्री नदी बोरज फाटा येथे करण्यात आला.

## सुधीर पुराणिक यांचे निधन

**। पाली । वार्ताहर ।**

शहरातील शिक्षण क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व, पालीतील शेठ ज.नौ. पालीवाला महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुधीर पुराणिक यांचे बुधवारी (दि.३) दीर्घ आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या अंत्यविधीला पाली शहरासह सुधागड तालुक्यातील नागरिक, शिक्षक वर्ग, आजी माजी विद्यार्थी, अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाने पाली शहरावर व पुराणिक कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रा. सुधीर पुराणिक यांना श्रद्धांजली वाहिली.



पुराणिक यांनी त्यांच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शेठ ज. नौ. पालिवाला महाविद्यालय पाली सुधागडचे भौतिकशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक म्हणून ३४ वर्षे काम पाहिले, २००५ सालापासून पालीवाला महाविद्यालयाचे ते उपप्राचार्य होते. २००४ ते २०११ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तर २०१२ ते २०१४ पर्यंत जिल्हा समन्वयक म्हणून त्यांनी उत्तम काम केले. मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे प्रभारी संचालक म्हणून त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या कारकिर्दीत मुंबई विद्यापीठामार्फत अनेक समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आले होते. प्राध्यापक सुधीर शरदचंद्र पुराणिक यांची महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचे अव्वल दर्जाचे मानांकन असलेल्या मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून काम केले. तसेच कोरोना काळात मदतकार्य, कम्युनिटी किचन, सुमारे ३५० ते ३७५ हून अधिक रक्तदान शिबिरे, २५ हजारहुन अधिक रक्तदान युनिट असे विविध उपक्रम पुराणिक सरांनी यशस्वीरित्या राबवली आहेत.

# सन फार्माकडून भौतिक सुविधा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील सहावर्षे बंद असलेली रामाचीवाडी येथील रायगड जिल्हा परिषद शाळा पुन्हा सुरु झाली आहे. ग्रामस्थांचा सहभागामुळे शाळेची वास्तू पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने गजबजून गेली होती. मात्र, भौतिक सुविधांपासून दूर असलेल्या या शाळेसाठी सन फार्मा या कंपनीने आपला सीएसआर फंड देऊन सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याबद्दल रामाचीवाडी मधील आदिवासी ग्रामस्थांनी पत्र देऊन आभार मानले आहेत.



२०१७ मध्ये कमी पटसंख्यामुळे कर्जत तालुक्यातील बोरिवली ग्रुप ग्रामपंचायतीमधील रामाचीवाडी येथील जिल्हा परिषदेची शाळा बंद करण्यात आली होती. १०० टक्के आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या आदिवासी शाळतील विद्यार्थ्यांना पाच किलोमीटर अंतरावरील अंजप गावातील जिल्हा परिषद शाळेत जावे लागत होते. त्यामुळे पालकांनादेखील विद्यार्थ्यांसोबत जावे लागायचे. परिणामी रोजगार बुडत असल्याने पालकांनी कर्जत पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडे केली होती. त्यानंतर तब्बल सहा वर्षांनी ऑक्टोबर २०२३ मध्ये या शाळेची घंटा पुन्हा वाजली होती. मात्र, शाळेतील अनेक पायाभूत सुविधांची विद्यार्थ्यांना कम तरता भासत होती. त्यामुळे शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी सन फार्मा या कंपनीबरोबर बोलणे सुरु केले आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी राम ाचीवाडी येथील शाळेसाठी अनेक वस्तू आपल्या कंपनीच्या सीएसआर फंडातून देऊन शाळेच्या परिसराला नवीन रूप आणले.

## शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.१०)सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत माणगावातील नितीन मेथा हॉल येथे करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घेण्याचे आवाहन उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांकडून याठिकाणी नेत्ररुग्णांची तपासणी केली जात असून ज्यांना मोतीबिंदू आहे अशा नेत्ररुग्णांना पनवेल येथे घेऊन जाऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया केली जाते. आतापर्यंत २ हजारहुन अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.



● मुरुड समुद्रकिनारी सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## इफ्तार पार्टीमुळे एकोप्याचे दर्शन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

इफ्तार पार्टीमुळे हिंदू-मुस्लिम समाजातील स्नेहभाव अधिक प्रमाणात वृद्धिंगत होऊन सामाजिक एकोप्याचे दर्शन घडते, असे प्रतिपादन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे यांनी माणगाव येथील इफ्तार पार्टी कार्यक्रमात बोलताना सांगितले. लोकनेते माजी आमदार अशोक साबळे विधी महाविद्यालय, द.ग.तटकरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.३) सायंकाळी महाविद्यालयाच्या प्रांगणात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

## आंबेडकर भवनाच्या जागेवर पार्कींग; जनता आक्रमक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यालासमोरील जागेत आंबेडकर भवन उभारून त्याचा वापर सर्व जातीधर्मांच्या लोकांना वापर करता येईल यासाठी आंबेडकरी नेते गेल्या वीस वर्षापासून नगरपरिषदेला निवेदन देउन मागणी करत आहेत. नगरपरिषदेने काही दिवसांपूर्वी टेंडर काढून या जागेत पे अँण्ड पार्किंग सुरू केल्याचे बोर्ड लावले आहे.

शिव, शाहु, फुले, आंबेडकर विचार मंचच्या पदाधिकऱ्यांनी शुक्रवारी (दि.२९) मार्च रोजी सकाळी ११ वाजता जोरदार घोषणाबाजी करीत निषेध व्यक्त केलो. खोपोली नगरपालिका आणि ठेकेदाराने दादागिरी केल्यास शिव, शाहु, फुले, आंबेडकर विचार मंच जशास तसे उत्तर देउ, असा इशारा देत या जागेवर भव्य दिव्य असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन होणार, असा निर्धार केला आहे.

यावेळी मोहन औसरमल, किशोर पानसरे, रविंद्र रोकडे, यशवंत गायकवाड, चिंतामनी सोनावणे, केविना गायकवाड, सुवर्णा मोरे, ओव्हाळ, रूपवेश रूपवते, विकी गायकवाड, विशाल गायकवाड, प्रकाश साळुंके, दिपक गायकवाड, राजू गायकवाड, गोपिनाथ सोनावणे, शंकर कांबले यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

# बैलगाडी शर्यतीत कर्नाटकी फंडा

**। मुरूड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील सारळ (रेवस) येथील समुद्र किनाऱ्यापासून आवास, किहीम, नवगाव, थळ, कामत, अलिबाग, रायवाडी, नागाव, रेवदंडा आदींसह मुरुड तालुक्यातील काशिद, चिकणी, नांदगाव, मुरुड तर श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर, श्रीवर्धन आदी समुद्र किनारी तर साताड, सारसोली, चणेरा, रोहा, माणगाव येथील माती मैदानावर प्रतिवर्षी जत्रा, महोत्सव, मान्यवरांचे वाढदिवस, अथवा अन्य कारणांमुळे सुट्टीच्या दिवसात बैलगाडी, घोडागाडीच्या शर्यतींचे आयोजन केले जाते. या शर्यतीत सुमारे पाचशे ते सहाशे बैलगाडी स्पर्धक मोठ्या हिरीरीने सहभागी होत असतात. सद्यस्थितीत या स्पर्धांतून कर्नाटकातील बैलांचा बोलबाला वाढला आहे.



या शर्यतींतील बारा पंधराशे बैलांत कर्नाटक व आसपासच्या कोल्हापूर, सांगली भागातील सुमारे सत्तर ते ऐंशी टक्के बैल हे कर्नाटकी जातीचे पळताना दिसून येत आहेत. भरदार देहयष्टी, टोकदार उंचच उंच खिलारी शिंगे, पांढरा शुभ्र रंग व वाकडी पिळदार शेपटी, रुबाबदार बांधा अशी ही जनावरे मातीच्या घाटावरील बैलगाडा शर्यतीत वेगाने सुसाट पळत विविध गटागटांतून क्रमांक पटकावलेले असतात. किमान आठ ते दहा कि.मी.अंतराच्या शर्यतीत अधिक वेळ भरधाव पळण्याची अंगी क्षमता असल्याने समुद्र किनार्यावरील चार ते पाच कि.मी.चे अंतर ते वेगाने लिलया कापतात. त्यामुळेच ते स्थानिक गावरान तसेच पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील अन्य जातीच्या बैलांहून पाळण्यात उजवे ठरत आहेत. परिणामी रायगड जिल्ह्यातील अनेक बैलगाडी शर्यतप्रेमी हौशी मालक, चालकांच्या नजरा त्यांच्यावर पडत आहेत.

या कर्नाटकी फंड्यामुळे अन्य जातीच्या बैलांची विक्री ही केवळ खटारा गाडी, नांगरणी अशा अवजड मेहनतीच्या कामासाठी होत असल्याने बैलांची खरेदी विक्री करून या व्यवसायातून चार पैसे मिळवून आपली घरे चालविणाऱ्या मधल्या दलालांची मोठी पंचायत झाली आहे. कारण अशा शर्यतीसाठी बैल खरेदी करताना जातीवंत बैलांच्या विक्रीत त्यांना बऱ्यापैकी नफा मिळत असे. परंतु, कर्नाटकी फंड्यामुळे हौशी गाडीवान थेट कर्नाटक व आजुबाजूच्या परिसरात जाऊन शर्यतीत धावणाऱ्या बैलांच्या खरेदी करीत आहेत. त्यामुळे त्यांचे नुकसान होत आहे.

# प्रकल्पात राजकीय म्होरक्यांची विरोधकांसह चंगळ

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानसारख्या या दुर्गम भागात कधी नव्हे ती विकास कामे मागील सहा ते सात वर्षांपासून प्रत्यक्षात मार्गी लागण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. परंतु, विकास तेथे विरोध हे गणितच असल्याने याही ठिकाणी नेहमीच स्वकीयांकडून प्रखरपणे विरोधाची भूमिका घेऊन जोपर्यंत आपल्या पारड्यात काही पडत नाही तोपर्यंत एखाद्या प्रसार माध्यमांना हाताशी धरून सकारात्मक कामाला सुध्दा पडद्याआड राहून एखादे बुजगावणे तयार करून स्वतःची पोळी भाजून घेण्यात इथली व्हाइट कॉलरची राजकीय मंडळी निष्णात आहेत. आणि ज्यांच्या पक्षांच्या माध्यमातून विकास कामे पूर्ण होणार आहेत त्या पक्षांची मंडळी स्वतःच्या कार्यकर्त्यांना एखाद्या महत्वपुर्ण कामात सामावून घेण्याऐवजी विकास कामाच्या विरोधात कोण जाणार आहेत त्यांची तोंडे बंद करण्यासाठी चिरीमिरी देऊन अथवा अन्य माध्यमातून रसद पुरवून विरोध संपुष्टात आणला जात आहे.



राजकीय म्होरक्यांनी प्रत्येक वेळी मोठमोठ्या आलेल्या प्रकल्पात गडगंज आर्थिक प्राप्ती केलेली आहे. एवढेच नव्हे तर रोप-वे सारखा महत्वकांक्षी प्रकल्प मार्गी लागणार होता त्या वेळेस टाटा समूहकडे या रोपे-वे प्रकल्पात मोठी मागणी केल्यामुळेच हा प्रकल्प टाटा समूहाने सोडून दिल्याचे बोलले जात आहे. अन्यथा याठिकाणी पर्यायी व्यवस्था केव्हाच उपलब्ध झाली असती. परंतु गचाळ, गलिच्छ राजनीतीमुळे केवळ आर्थिक हव्यासापोटी हा प्रकल्प आजही लाल फितीत अडकून पडला आहे. त्यामुळेच ह्या सुंदर स्थळाला विकासापासून रोखण्यात राजकीय पक्षांचा सिंहाचा वाटा आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● विहिरी - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७

● मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१

● अकाऊंटंट पाहिजे- जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३१११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.

● विक्री आणि marketing व्यक्ती आवश्यक आहे । किमान पदवी पूर्ण केलेला । ०-२ वर्षे अनुभव । प्रतिस्पर्धी पगार । marketing कौशल्ये असली पाहिजेत Accountant आवश्यक आहे । टॅली अनिवार्य । ०-२ वर्षे अनुभव । सर्व दुकान खाते घेणे पाहिजे । दुकानमधून काम । प्रतिस्पर्धी पगार रसिक हार्डवेअर । फोन नंबर: +९१ ९४२२६९०८५४

● अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास ३०० नग सोललेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडच्या कलिंगडाची गोडी हरपली

## लिंबूनेही फोडला घाम

**। पाली । वार्ताहर ।**

**उन्हाची काहिली वाढत आहे. त्यामुळे शरीराला थंडावा देणाऱ्या कलिंगड, लिंबू, उस आणि काकडीला मागणी वाढत आहे. परंतु, अवकाळी पावसामुळे याचे उत्पादन घटले असून दर्जाही खालावला आहे. त्यामुळे या फळांचे भाव वाढल्याने सर्वांना घाम फुटला आहे. तसेच, जिल्ह्यातील स्थानिक कलिंगडाचा गोडवा सुद्धा कमी झाला आहे.**





निसर्गाची देण असलेले कलिंगड, लिंबु सरबत, उसाचा रस आणि काकडी हे उष्मा घालविण्यासाठी सर्वात सोपा व स्वस्त पर्याय आहे. परंतु, जिल्ह्यासह राज्यात पडलेला अवकाळी पाऊस यामुळे कलिंगड, लिंबू आणि काकडीचे नुकसान झाले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी २० ते २५ टक्यांनी भाव वाढले आहेत. अवकाळी पावसाने रायगडच्या कलिंगडाची गोडी उडाली आहे. त्यामुळे नाशिक व इतर ठिकाणावरील कलिंगड जिल्ह्यात विक्रीसाठी येत आहेत. लिंबाचीही आवक घटली आहे. त्यामुळे त्यांचेही भाव वधारले आहेत. लिंबाला तर संत्री आणि मोसंबी इतका भाव आहे. त्यामुळे लिंबू सरबतही महागले आहे. कोकम व काकडीचे भावही वधारले आहेत. मागील वर्षी पेक्षा यावर्षी कलिंगडामध्ये २० ते २५ रुपयांनी वाढ झाली आहे. तर एका मोठ्या काकडीमागे पाच ते १० रुपयांनी वाढ झाली आहे. उसाचे दरही शेकड्यामागे १०० रुपयांनी वाढले आहेत. परिणामी उष्म्यापासुन बचाव करण्यासाठी आता नैसर्गिक पर्याय सोडुन कृत्रिम पर्याय निवडत आहेत.

> उन्हाळ्यात लिंबाची मागणी वाढली आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे आवक कमी झाली आहे. घाऊक बाजारात लिंबाचे भाव वाढले आहेत. परिणामी किरकोळ बाजारातही लिंबाचे भाव प्रचंड वाढले आहेत. मात्र, ग्राहक कमी किंमतीत मागणी करतात हे परवडत नाही.
>
> \- कल्पेश थळे, भाजी विक्रेता

> पावसाने या वर्षी जिल्ह्यातील कलिंगडाची गोडी हरवली आहे. उत्पादन घटले असून कलिंगडाचा आकारही प्रमाणात नाही. बहुतेक माल खराब निघत आहे. योग्य तो भाव मिळत नाही. त्यामुळे नुकसान होत आहे. परिणामी नाशिक येथून सुगरकेन जातीचे कलिंगड विक्रीसाठी आणावे लागत आहेत.
>
> \- उमेश मढवी, कलिंगड विक्रेता, पाली

### वधारलेले दर

*१) मोठा लिंबू : ८ रुपयाला १ (मागील वर्षी ५ रुपयाला १)*
*२) छोटा लिंबू : १० रुपयाला २ (मागील वर्षी १० रुपयाला ३)*
*३) मोठा कलिंगड : ९० ते ११० रुपये २ ते ३ किलो (मागील वर्षी ५० ते ७० रुपये)*
*४) मोठी काकडी : २५ रुपये (मागील वर्षी १५ ते २० रुपये)*
*५) उसाचा रस : हाफ १५ रुपये, फुल २० रुपये (मागील वर्षी हाफ १० व फुल १५ रुपये)*
*६) कोकम : १०० ते १२० रुपये किलो (मागील वर्षी ८० रुपये किलो)*

# कोलमांडला अनधिकृत भरावाची शासकीय पाहणी

। रेवदंडा । वार्ताहर ।

मुरूड तालुक्यातील कोलमांडला येथे कांदळवन तोड करून करण्यात आलेल्या अनाधिकृत अतिक्रमण भरावाची तसेच कांदळवन तोडीबाबत शासकीय तपासणी नुकतीच करण्यात आली. कोलमांडला येथील रहिवासी प्रतिक कणगी यांनी मॅग्रोह सुरक्षा या संकेत स्थळांवर केलेल्या तक्रार निवेदन अर्जाची दखल घेण्यात आली.



मॅग्रोव्ह सुरक्षा संकेत स्थळावर कोलमांडला रहिवासी प्रतिक कणगी यांनी १९ मार्च २०२४ रोजी तक्रार निवेदन अर्ज दिला होता. यामध्ये मुरूड तालुक्यातील कोलमांडला गट क्रमांक ५४ येथे शासकीय राखीव वन जमिनीत अनाधिकृतपणे भराव करण्यात आला आहे. वारंवार सूचना व तक्रारी देऊन फक्त अनधिकृत कामास तात्पुरती स्थगिती देण्यात आली परंतु, अद्यापही कांदळवन भराव हटविण्यात आला नाही. सदर प्रकाराने भविष्यात पुनःश्च अतिक्रमण जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर भरावाखाली कांदळवन वृक्ष दबले असून तेथील भराव हटवून या ठिकाणी नवीन कांदळवन वृक्षाची पुर्नलागवड करावी अशी मागणी या तक्रार निवेदन अर्जात केली होती. कोलमांडला स्थळ पाहणी करून कांदळवन तोड झाल्याचे कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असे म्हटले आहे. त्यानुसार २ मार्च २०२४ रोजी कोलमांडला संयुक्त स्थळ पहाणी सकाळी अकरा वाजता करण्यात आली. सन २००५ पासूनचे गुगल ईमेल, एमआरएसएसीकडील नकाशाचे अवलोकन करून तसेच वस्तुस्थितीबाबतचे छायाचित्र सर्व संबधीत यंत्रणानी एकत्रीत स्वाक्षरीचा अहवाल अलिबाग व मुरूड तालुका स्तरावर गठीत केलेल्या समितीचे सचिव तसेच परिक्षेत्र वनअधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात सादर करण्यात येणार आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# हेटवणे धरणात ४८ टक्के पाणीसाठा

। खारघर । वार्ताहर ।

सिडको वसाहतीत पाणीपुरवठा करणाऱ्या हेटवणे धरणात ४८ टक्के पाणीसाठा आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून हेटवणे तलावातील पाणीसाठा वेगाने कमी होत असल्यामुळे लवकरच पाणी कपातीचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सिडको अधिकाऱ्यांनी सांगितले. सिडको अखत्यारित खारघर, उलवे, तळोजा, द्रोणागिरी आदी परिसरात हेटवणे धरणातून पाणीपुरवठा केला जातो. सद्य:स्थितीत धरणात ४८ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे जून-जुलै महिन्यापर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा आहे. दरम्यान, नवी मुंबई महापालिकेकडून सिडकोच्या तर एमआयडीसीकडून तळोजा वसाहतीत आठ एमएलडी पाणीपुरवठा केला जात आहे. सिडकोच्या तळोजा वसाहतीत गेल्या काही दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे रहिवासी यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे, तळोजा वसाहतीत सिडकोकडून नव्याने गृहसंकुलाचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे तळोजा वसाहतीत पाणी समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. तर खारघरमधील काही सेक्टरमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. हेटवणे धरणातील पाण्याच्या पातळीत घट होत असून मागील वर्षीप्रमाणे परिस्थिती ओढवल्यास दहा टक्के पाणी कपातीची शक्यता असून लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सिडको वसाहतीत पाणी कपातीचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सिडकोच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

# कचऱ्यामुळे खोपोलीकर त्रस्त

**खोपोली :** खोपोली नगरपालिकेकडून स्वच्छता सर्वेक्षण अभियानअंतर्गत सर्वत्र भिंती रंगवून स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. भिंती रंगविण्यात लाखो रुपये खर्च केले जात आहेत. मात्र, शहरातील बहुसंख्य गटारे तुडुंब भरली असून नैसर्गिक नाल्यात कचरा साचला आहे. शहरातील सांडपाण्याचे योग्यरीत्या निचरा होत नसल्याने डासांची उत्पत्ती वाढली असून नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे नुसत्या भिंती रंगवून स्वच्छतेचा संदेश दिल्याने शहर स्वच्छ होणार का, असा सवाल केला जात आहे.

शहरात स्वच्छता अभियानअंतर्गत लाखो रुपयांचा निधी खर्च होत आहे. तरीदेखील शहरात सर्वत्र कचरा दिसून येत आहे. रहिवासी संकुल, बैठ्या वसाहती, सार्वजनिक गटारे व नैसर्गिक नाल्यांची स्थिती भयानक आहे. गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्यांनी गटारे भरली आहेत. अनेक गटारे तुटलेल्या अवस्थेत असून सांडपाणी निचरा होत नसल्याने डासांची उत्पत्ती होत आहे. दुसरीकडे स्वच्छता संदेश व भिंती रंगविण्यात पालिका प्रशासन समाधान मानत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे विणेगाव, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक जादवजीभाई जीवराजभाई वाघाणी यांचेकडून सदर मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| गट क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ५२ | ०-२०-०० | ०-३२ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०५/०४/२०२४

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक गुलाबचंद शामजी हरिया यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३६/१/ब/४ | ०२-०२-०० | ०.६९ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : -०५ एप्रिल २०२४

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-खांडस, तालुका-कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १) प्रीती देवेंद्र सिंह | ७६ | ४/६ | ०.४०.०० | ०.३६ |
| २) मनिषा राम परदेशी | ७६ | ४/७ | ०.४०.०० | ०.३६ |

सदरच्या जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदूंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. ०५/०४/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती माधुरी मधुकर भुजबळ, रा.आर एच ए, परिधी को. ऑ. हौ. सोसायटी, प्लॉट नं. ९, पिल्लई कॉलेज जवळ, सेक्टर १६, न्यु पनवेल, पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३/१/अ | ०.६०.००<br>पो. ख ०.०६.७० | २.३० | श्री. ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे, वगैरे |
| | एकूण ०.६६.७० | | |

**यापैकी श्री . ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०.१६.०० हे.आर.पॉ.**

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०४/०४/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक सौ. दिशा सुभाष भोसले, व श्री. सुभाष पांडूरंग भोसले, दोघेही रा. दि बया पार्क, तुलसी पाइप रोड, प्लाझा सिनेमा मागे, दादर वेस्ट, मुंबई ४०००२८ यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे,

**मौजे सायडोंगर, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.-आर | आकार रू.=पैसे |
|---|---|---|---|
| ४१ | १ | ०-९५.७० | ३=४७ |

यापैकी ०-४७.८५ हेक्टर सौ. दिशा सुभाष भोसले, व श्री. सुभाष पांडूरंग भोसले, यांचे मालकीची.

तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा.


तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकीत दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.

तारीख:- ०५-०४-२०२४.

**श्री. विवेक अशोक धनवी,**
बी. कॉम., एल्‌एल्‌.बी., ॲडव्होकेट, ऑफीस गाळा नं. ७ सुमनराज को-ऑप. हौऊ. सोसायटी, पाटीलआळी,
दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड, मोबाईल नंबर ९०११७३६००२.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील:
**श्री. एम. वाय. धामणे**
मो. ९७६७२५०११०
नि. ७/ड

**रोहे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ०४/२०२४

श्रीम. नसीमा निजामुदीन सय्यद ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ...सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार यांचे पती कै. निजामुद्दीन अब्दुल रेहमान सय्यद यांचा मृत्यू दिनांक १७/०४/२०२१ रोजी झाला असून त्यांच्या नावे होंडा कंपनीची मोटार सायकल अक्टीव्हा ३ जी चे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट (आर सी) असून दि. १८ एप्रिल २०१५ रोजीचा आर.टी.ओ रजिस्ट्रेशन क्र.MH06BL7656 असून रंग T BLUE M असा आहे. मयत कै. निजामुद्दीन सय्यद यांचे नसीमा निजामुद्दिन सय्यद ह्या एकमेव कायदेशीर वारस असून त्यांच्या नावे होण्याकरिता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट (आर सी) होण्याकरिता सक्सेशन सर्टिफिकेट या मे. न्यायालयात अर्ज दाखल असून या संदर्भात कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून १५ दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात, मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना सक्सेशन सर्टिफिकेट देण्यासंदर्भात आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९/०२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक,** दिवाणी न्यायालय क स्तर
**शिक्का**
सही/- **सहा. अधीक्षक** दिवाणी न्यायालय क स्तर

## -: जाहीर नोटीस :-

दिनांक : ०४/०४/२०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे भार्जे तालुका सुधागड जिल्हा रायगड येथिल खालील मिळकती त्यांचे मूळ मालक श्री. गणेश कुमार टंडन यांच्याकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**-: मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे भार्जे, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे क्र./ गट क्रं. | खाता नं. | क्षेत्र हे.आर. | पैकी खरेदी क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| ७० | ६३४ | १-०९-०० | ०-२०-०० | ०.३४ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपटटा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, धारणाधिकार, ताबा, भेट, देवाणघेवाण, विभाजन, शुल्क, ट्रस्ट, वारसा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, शिर्षक, व्याज, दावा किंवा मागणी असलेल्या आणी दावा करणाऱ्या कोणीही या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेंत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

पाली
दिनांक :- ०४/०४/२०२४.

**( ॲड. अमोल रामचंद्र कांबळे)**
मु.पो.पाली ता. सुधागड जि. रायगड
मो. ९०२८२४८५१७

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा**
**जि. रायगड दुरध्वनी क्रमांक -०२१४०-२६९३१७ फॅक्स- २६९०४२**
Email ID-tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/ जाहिर नोटीस/७६९/२०२४
दि. ०४/०४/२०२४

## जाहिर नोटीस मसुदा

श्री. सागर सुरेश वजरकर
मु.तळा ता. तळा जि. रायगड ... अर्जदार

विरुध्द

३. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी,
नगरपंचायत तळा ... सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांचा मुलगा अर्थव सागर वजरकर यांचा जन्म दि. २१/०५/२०१२ रोजी मौजे तळा ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.१०/०१/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये यांचा मुलगा अर्थव सागर वजरकर याचा जन्म दि. २१/०५/२०१२ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची नोटीस जाहिर प्रसिद्ध करण्यात येत असून १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांचा मुलगा अर्थव सागर वजरकर याचे जन्म नोंदीबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.०४ एप्रिल, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
कार्यकारी दंडाधिकारी तळा

**शिवकृपा को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. चेंढरे-अलिबाग**
रजि. नं. केबीओ/एचएसजी/१००८/ सन १९८३ दि. २९/०२/१९८३
शिवाजीनगर, शासकिय कॉलनी मागे, नागडोंगरी, चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड

जा.क्रमांक शिवकृपा को. ऑप. सो. चेंढरे/पुनर्विकास/
दि. /०३/२०२४

## जाहीर नोटीस

शिवकृपा को. ऑप. हौसिंग सोसायटी, मर्यादित चेंढरे-अलिबाग यांच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, शिवकृपा को. ऑप. हौसिंग सोसायटी, मर्यादित चेंढरे-अलिबाग ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून तिचा नोंदणी क्र. रजि. नं. केबीओ/एचएसजी/१००८/सन१९८३ दि. २१/०२/१९८३ असा आहे. उपरोक्त संस्थेच्या नावे व ताबे कब्जात असलेल्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सिटी सर्व्हे क्र. | क्षेत्र चौ. मिटर | सत्ता प्रकार |
|---|---|---|---|
| १ | १२१/६/अ प्लॉट नं.६ | १३०५.०० | अ |

सदर मिळकतीवर आज रोजी शिवकृपा को. ऑप. हौसिंग सोसायटी, मर्यादित चेंढरे-अलिबाग या संस्थेची इमारत आस्तित्वात आहे. या इमारतीमध्ये १२ सदनिका आहेत.

सदरची इमारत ही साधारणता ३५ ते ४० वर्षांची जुनी झाली असून तिचा पुनर्विकास करण्याचा आहे. तरी उपरोक्त पुनर्विकास करणे कामी आर्थिक आणि तांत्रिक दृष्टीने सबळ असणाऱ्या व अशा बांधकामाचा पूर्वानुभव असणाऱ्या विकासकामांपासून सदर नोटीस प्रसिध्द झालेंपासून १० दिवसांत देकार मागविण्यात येत आहे. संबंधित कागदपत्रे व इतर तपशील बघण्याकरीता सुट्टीचे दिवस वगळता आमच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. कोणताही देकार स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार शिवकृपा को. ऑप. हौसिंग सोसायटी, मर्यादित चेंढरे- अलिबाग यांच्या व्यवस्थापन समिती राखून ठेवत आहे.

**सही/- सचिव,** **सही/- चेअरमन,**
**शिवकृपा को. ऑप. सोसायटी लि.**
**चेंढरे अलिबाग**

## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चोंढी, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक १. दिपेश जगदिश कपाडिया २. अमोल जगदीश कपाडिया, ३. अझिम फैजुल्लाह तापीया, ४. जावेद फैजुल्लाह तापीया सर्व रा. मुंबई यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी तोंडी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| चोंढी ता. अलिबाग, जि. रायगड | ९७/३ | १-८९-००<br>०-४२-०० पो.ख.<br>२- ३१-०० एकूण | ११.४२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ५.०४.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
अलिबाग कार्यालयाजवळ अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. सचिन कमळाकर म्हात्रे २) श्री. मिलिंद कमळाकर म्हात्रे रा. चोरगुंडी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून तश्या साठेकरार विद्यमान मालकांनी आमचे अशिलाना करून दिलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| तळाशेत ता. अलिबाग | १००/१/ब | जिरायत ०-३०-००<br>वरकस ०-३०-००<br>एकूण ०-६०-०० | ६.०१ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीमधील ०-२०-०० हे. आर. मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख ०४/०४/२०२४

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर पो.
अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण संस्थेच्या शतक महोत्सवा निमित्त क्रिकेट स्पर्धाचे आयोजन

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण संस्थेच्या शतक महोत्सवा निमित्त रायगड जिल्हयातील शिक्षक सभासदांच्या क्रिकेट स्पर्धाचे आयोजन पेण नगरपालिका सचिन रमेश तेंडूलकर स्टेडीयम पेण येथे दिनांक ०५/०४/२०२४ व दिनांक ०६/०४/२०२४ रोजी आयोजीत केले आहे तरी सर्व सभासदांनी क्रिकेट स्पर्धेसाठी आवश्यक हजर राहावे असे अवाहन संस्थेचे चेअरमन श्री.रविंद्र विनायक पाटील, व्हा.चेअरमन श्री.अरविन्द बाळकृष्ण मोरे मानद सचिव श्री.सोपान रामचंद्र चांदे व सर्व संचालक मंडळातर्फे करण्यात येत आहे.

दि. ०५/०४/२०२४

शिक्का

**सही/-**
**सेक्रेटरी**
**पेण प्राथमिक शिक्षक सह.पतपेढी लि.**

## जाहीर नोटीस

आमच्या अशिल श्रीमती छाया बळीराम वायरे रा. सुंदरबन, मु. पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

मौजे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड येथे गट नं. ४८५/२, गट नं.४८६ व गट नं.४८९ या मिळकती श्रीमती. प्रिया नरेश आठवले यांच्या मालकीच्या आहेत. सदरहू मिळकतीमध्ये ग्रुप ग्रामपंचायत झिराड हद्दीत मिळकत क्र.६९५, मिळकत क्र.६९५अ व मिळकत नं.६९५अ/१ ने ओळखली जाणारी घरे आहेत.

आमच्या अशिलांनी ग्रुप ग्रामपंचायत झिराड हद्दीतील घर नं. ६९५अ/१ या मिळकतीसंदर्भात ठरावाकरीता व इतर मागण्यांकरीता दि. २८/०३/२०२२ रोजी श्रीमती. प्रिया नरेश आठवले यांच्या विरुध्द अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात स्पेशल मुकदमा नं. ४५/२०२२ ने दावा दाखल केलेला आहे, तो प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

असे असताना श्रीमती. प्रिया नरेश आठवले या सदरहू मिळकतीसंदर्भात हस्तांतरणाचा व्यवहार करीत आहेत असे आमच्या अशिलांस खात्रीलायक समजले.

आमच्या अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील ग्रुप ग्रामपंचायत झिराड हद्दीतील घर नं.६९५अ/१ या मिळकतींसंबंधी कुणीही कोणत्याही प्रकाराचा खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. सदरहू व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०४/०४/२०२४.

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला, हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी, सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड. मोबा. नं. ९८६७७१५५२४

**निवडक**

### ब्रिजभूषणचा होणार फैसला

**नवी दिल्ली :** भारतीय कुस्तीमहासंघाचा माजी अध्यक्ष आणि भाजपचे उत्तर प्रदेशातील खासदार ब्रिजभूषण सिंह याच्यावर ऑलिम्पिकविजेत्या कुस्तीपटूंच्या लैंगिक शोषणाचे आरोप होते. या प्रकरणी दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टानं आपला निकाल १८ एप्रिलपर्यंत राखून ठेवला आहे. याप्रकरणी ऑलिम्पिकपटू साक्षी मलिक, विनेश फोगाट यांच्यासह इतर काही महिला कुस्तीपटूंनी ब्रिजभूषणवर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल व्हावा यासाठी दिल्लीच्या स्थानिक कोर्टात याचिका दाखल केली होती.

### सुपर किंग्जला धक्का

**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्जला त्यांच्या मागील सामन्यात दिल्ली कॅपिटल्सकडून पराभव पत्करावा लागला. अशातच आता त्यांच्या संघाची आणखी डोकेदुखी वाढली आहे. कारण संघाचा स्टार वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान पुढच्या किमान दोन सामन्यांना मुकणार आहे. खरंतर टी-२० विश्वचषकासाठी यूएस व्हिसाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तो बांगलादेशला परतल्यामुळे आयपीएलच्या काही सामन्यांना मुकणार आहे. मुस्तफिजुरने आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील सलामीच्या सामन्यात चेन्नईसाठी चमकदार कामगिरी करून 'सामनावीर'चा पुरस्कार पटकावला होता.

### वॉनचे गल्ली क्रिकेट

**मुंबई :** इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनने मुंबईत गल्ली क्रिकेटचा आनंद लुटला. त्याने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये पाहायला मिळते की, वॉन लहानग्यांसोबत गल्ली क्रिकेट खेळत असून एक चिमुकला त्याला गोलंदाजी करत आहे. अनवाणी बॉलर अन् पुढ्याचा स्टम्प या व्हिडीओमध्ये प्रकर्षाने जाणवत आहे. तसेच, वाळूत रंगलेला हा क्रिकेटचा थरार सर्वांचे लक्ष वेधत आहे. व्हिडीओ शेअर करताना लहानग्यांसोबत क्रिकेट खेळून आनंद वाटल्याचे म्हटले आहे.

### घनःश्यामची सुवर्ण कामगिरी

**रसायनी :** नॅशनल अरबन गेम्स् फेडरेशन ऑफ इंडिया ॲथलेटिक्स् चॅम्पीयनशीपची स्पर्धा गोवा येथे पार पडली. यात ५० वर्षावरील गटात रसायनीचे घनःश्याम मशीलकर यांनी रिलायन्स इंडस्ट्रीज पाताळगंगा कंपनीकडून राज्याचे प्रतिनिधीत्व करून १०० मीटर धावणे, लांब उडी, तिहेरी उडी, थाळी फेकमध्ये प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक जिंकण्याचा मान मिळवला. त्यांनी चार सुवर्ण पदके मिळवून रायगडसह महाराष्ट्राचे नाव लौकिक केले आहे.

### केकेआरने रचला इतिहास

**नवी दिल्ली :** आयपीएलमधील १६व्या सामन्यात कोलकाता आणि दिल्लीचे संघ सामना खेळण्यात आला. या सामन्यात कोलकाताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. केकेआरच्या फलंदाजांनी कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवत दिल्लीच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई करत ७ बाद २७२ धावांचा डोंगर उभारत आयपीएलच्या इतिहासातील दुसरी सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. तसेच, दिल्लीला २७३ धावांचे लक्ष्य दिले होते.

## हार्दिक पांड्याला अल्टिमेटम

# मुंबई ॲक्शन मोडमध्ये



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**हार्दिक पांड्या हा सध्याच्या घडीला सर्वात जास्त ट्रोल होत आहे. मुंबई इंडियन्सचे कर्णधारपद स्विकारल्यापासून हार्दिकला सर्व ठिकाणी चिडवले जात आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्सच्या संघाचीही बदनामी होत असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आता मुंबई इंडियन्सचा संघ ॲक्शन मोडमध्ये आला आहे आणि त्यांनी हार्दिक पांड्याला अल्टीमेटम दिल्याचे समोर आले आहे.**

मुंबई इंडियन्सची यंदाच्या आयपीएलची सुरुवात वाईट झाली. कारण मुंबईच्या संघाला पहिल्याच सामन्यात पराभव पत्करावा लागला. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात तर मुंबई इंडियन्सचे नाक कापले गेले. कारण हैदराबादच्या संघाने आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक धावा या मुंबई इंडियन्सच्या संघाविरुद्ध केल्या होत्या. या सामन्यातही मुंबईला पराभव पत्करावा लागला. तिसऱ्या सामन्यात तर मुंबईच्या संघाती लाज गेली. कारण त्यांचा लाजीरवाणा पराभव झाला. या तीन पराभवानंतर आता मुंबई इंडियन्सच्या संघाने हार्दिक पंड्याला अल्टीमेटम दिल्याचे समोर आले आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई इंडियन्सच्या संघाने तीन पराभवानंतर आता एक मोठा निर्णय घेण्याचे ठरवले आहे. कारण सध्याच्या घडीला मुंबई इंडियन्स हा या आयपीएलमधील एकच संघ आहे, जो एकही सामान जिंकू शकलेला नाही. मुंबईचा संघ हा गुणतालिकेत दहाव्या स्थानावर पोहोचला आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्सच्या संघाने आता कडक पाऊल उचलायचे ठरवले आहे. मुंबई इंडियन्स हार्दिक पांड्याला अजून दोन सामने कर्णधारपद निभावण्याची मुभा देणार आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्ससाठी हार्दिक हा पाच सामने तरी कर्णधार असेल. त्यामुळे आता जर आगामी दोन सामन्यांत हार्दिकला संघाला विजय मिळवून देता आला नाही, तर त्याला कर्णधारपदावरून काढले जाऊ शकते. त्यामुळे आता येत्या दोन सामन्यांत मुंबई इंडियन्सचा संघ सामना जिंकतो की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागेलेले असणार आहे. या पुढील दोन्ही सामन्यांत मुंबईचा संघ पराभूत झाला तर हार्दिक पांड्याला कर्णधारपदावरून काढणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

त्याचबरोबर हार्दिकला कर्णधारपदावरून काढले तर कोणाकडे संघाचे नेतृत्व सोपवले जाणार, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यामुळे आता मुंबईचा संघ पुन्हा रोहित शर्माकडे कर्णधारपदासाठी जाणार का, याची उत्सुकता मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांना नक्कीच असणार आहे.

## संवादातील स्पष्टता महत्त्वाची: शास्त्री

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हार्दिक पांड्याला कर्णधार करून मुंबई इंडियन्सने चाहत्यांचा रोष ओढवून घेतला आहे. कर्णधारपदाचा निर्णय घेण्यापूर्वी संघाने संवादात स्पष्टता राखली असती, तर हा वाद टाळता आला असता, असे मत भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी मांडले आहे.



चाहत्यांना कर्णधारपदातील बदल पचनी पडलेला नाही. या वादात पांड्याने शांत राहावे. दमदार कामगिरी दाखवून वादळाचा सामना करावा. हा भारतीय संघ नाही. यामध्ये संघ मालकाने खेळाडूंना सर्वाधिक पैसे दिले आहेत. त्यामुळे कर्णधार कोण असावा, हा त्यांचा अधिकार आहे. पण, तरी हे प्रकरण त्यांना अधिक चांगले हाताळता आले असते. यासाठी त्यांनी संवादात स्पष्टता ठेवणे गरजेचे होते, असे रवी शास्त्री म्हणाले.

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी रायगडचे दोन खेळाडू

**। पनवेल । वार्ताहर ।**

पॉवरलिफ्टिंग इंडियाच्या वतीने बशीर बाग हैदराबाद येथील लालबहादूर शास्त्री इन डोअर स्टेडियमवर क्लासिक सीनियर पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ८ ते १२ एप्रिल या कालावधीत होणार आहेत.

या स्पर्धेत१५० पेक्षा जास्त पुरुष आणि १०० पेक्षा जास्त महिला खेळाडू सहभागी होतील. महाराष्ट्राच्या संघात रायगडचे बबन बाबू झोरे (वाघेश्वर-कर्जत) ५९ किलो वजनी गट आणि गणेश संजय तोटे (तक्का-पनवेल) १०५ किलो वजनी गट यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबाबत बबन झोरे यांना विनोद येवले आणि गणेश तोटे यांना प्रमोद पवार व त्यांचे प्रशिक्षक विशाल मुळे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

तसेच, पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्यावतीने गिरीश वेदक, यशवंत मोकल, सचिन भालेराव, सुभाष टेंबे, संदीप पाटकर, राहुल गजरमल यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. दोन्ही खेळाडूंनी राज्य स्पर्धेत चांगली कामगिरी केली असल्यामुळे ते पदक विजेते होतील, असा विश्वास राष्ट्रीय पदक विजेते माधव पंडित यांनी व्यक्त केला आहे.

## कॅन्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेबाबत हम्पीकडून अपेक्षा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

'कॅन्डिडेट्स'मध्ये पाच भारतीय बुद्धिबळपटूंचा सहभाग असला, तरी त्यांच्याकडून जेतेपदाची अपेक्षा बाळगणे योग्य ठरणार नाही. मात्र, अनुभवाच्या जोरावर कोनेरू हम्पी भारताकडून सर्वोत्तम कामगिरी करू शकेल, असे मत ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू प्रवीण ठिपसे आणि बुद्धिबळ प्रशिक्षक रघुनंदन गोखले यांनी व्यक्त केले.



भारताचे पाच बुद्धिबळपटू एकाच वेळी 'कॅन्डिडेट्स' मध्ये खेळणे हे नक्कीच खूप मोठी गोष्ट आहे. प्रज्ञानंद, गुकेश आणि वैशाली यांनी आपल्यातील गुणवत्ता सिद्ध केली असली, तरी ते खूप युवा आहेत. इतक्या वरच्या स्तरावर खेळण्याचा त्यांना फारसा अनुभव नाही. त्यामुळे त्यांच्याकडून जेतेपदाची अपेक्षा बाळगणे योग्य ठरणार नाही. आपले मानांकन सुधारण्यासाठी त्यांना ही स्पर्धा फायदेशीर ठरू शकेल.

विदित या स्पर्धेत भारताकडून सर्वात चांगली कामगिरी करू शकेल असे काही महिन्यांपूर्वी वाटत होते. मात्र, त्यानंतर त्याने कामगिरीत सातत्य राखलेले नाही. त्यामुळे सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये त्याला लय सापडणे आवश्यक आहे. भारताच्या पाच बुद्धिबळपटूंपैकी हम्पीकडून सर्वाधिक अपेक्षा बाळगल्या जाऊ शकतील. परंतु हम्पीची तयारी कशी आहे हे पाहावे लागेल. हम्पी खूप उच्च दर्जाची खेळाडू आहे. महिला विभागात कोणत्या एका खेळाडूचे पारडे जड वाटत नाही. त्यामुळे हम्पी चांगली कामगिरी करू शकेल,फ्फ असे ठिपसे म्हणाले. असेच काहीसे मत गोखले यांनीही व्यक्त केले.

## सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ डोंबिवली कल्याणतर्फे कबड्डी स्पर्धा

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ (डोंबिवली - कल्याण) यांच्या विद्यमाने गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुधागड तालुका स्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन मंगळवारी (दि.९) शिवाई बालक मंदिर, डोंबिवली येथे करण्यात येत आहे.



सुधागड तालुक्यातील ३२ संघांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. सुधागड तालुक्यातील सर्व क्रीडा रसिक, खेळाडू, हितचिंतक, देणगीदार, यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून क्रीडा महोत्सवाची शोभा वाढवावी.

या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक २१ हजार आणि आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक १५ हजार आकर्षक चषक, तृतीय क्रमांक आणि चतुर्थ क्रमांक प्रत्येकी १० हजार व आकर्षक चषक तर सर्वोत्कृष्ट खेळाडू सायकल, उत्कृष्ट चढाई, उत्कृष्ट पक्कड, पब्लिक हिरो यासाठी आकर्षक चषक देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे लाईव्ह युट्यूब प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

ऑनलाईन प्रवेश नोंदणीसाठी राजेश मोरे ७०६६८९१४५६, अंकुश शिवलकर ८४५१८९१३३८ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

## महिला संघ बांगलादेश दौऱ्यावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा महिला क्रिकेट संघ पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी बांगलादेश दौऱ्यावर जाणार आहे. दि. २८ एप्रिल ते ९ मे या कालावधीत ही मालिका खेळवली जाणार आहे.



बांगलादेश क्रिकेट बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय संघ २३ एप्रिलला बांगलादेशात पोहोचेल आणि १० मेला भारताकडे रवाना होईल. सर्व सामने सिल्हेट येथे खेळवले जाणार आहेत. दरम्यान, मागील वर्षी भारतीय संघ जेव्हा बांगलादेशात गेला होता तेव्हा ती मालिका नाना कारणांनी चर्चेत राहिली होती. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरला वादग्रस्त निर्णयावर बाद दिल्याने नाट्यमय घडामोडी घडल्या होत्या. यामुळे बांगलादेश येथे खेळली जाणारी मालिका क्रीडा रसिकांसाठी प्रेक्षणीय ठरणार आहे.

**टी-२० मालिकेचे वेळापत्रक**

- २८ एप्रिल- पहिला सामना- सिल्हेट
- ३० एप्रिल- दुसरा सामना-सिल्हेट
- २ मे - तिसरा सामना - सिल्हेट
- ६ मे - चौथा सामना - सिल्हेट
- ९ मे - पाचवा सामना - सिल्हेट

## पंतवर एक सामन्याची बंदी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ऋषभ पंतसाठी आयपीएल २०२४ मधील टेन्शन कमी काय होत नाही. कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध झालेल्या सामन्यात संघाने अतिशय लाजिरवाणी कामगिरी केली. या सामन्यात दिल्लीचा १०६ धावांनी पराभव झाला. त्याचबरोबर आता बीसीसीआयनेही पंतवर मोठी कारवाई केली आहे.



स्लो ओव्हर रेटमुळे बीसीसीआयने ऋषभ पंतवर कारवाई केली आहे. या मोसमात ऋषभ पंतला स्लो ओव्हर रेटमुळे दंड ठोठावण्याची ही दुसरी वेळ आहे. यामुळे बीसीसीआयने त्याच्यावर २४ लाखांचा दंड ठोठावला आहे. त्याचवेळी, मागील सामन्यात ऋषभ पंतवर १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला होता. पंतच्या नेतृत्वाखाली दिल्लीला या दोन्ही सामन्यांमध्ये नियमित वेळेत २० षटकेही पूर्ण करता आली नाहीत. त्याचवेळी, यावेळी पंतसह संघातील इतर खेळाडूंनाही ६ लाख रुपये किंवा मॅच फीच्या २५% दंड ठोठावण्यात आला आहे.

## पृथ्वी शॉ जाणार गजाआड?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएलमध्ये दिल्लीचा स्टार खेळाडू पृथ्वी शॉच्या अडचणी वाढल्या आहेत. पृथ्वी शॉविरुद्ध मुलीच्या विनयभंगाच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुंबई न्यायालयाने पोलिसांना दिले आहेत. ही घटना गेल्या वर्षी घडली होती, त्यावर न्यायालयाने आता हा निर्णय दिला आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये पृथ्वी शॉ आणि सोशल मीडिया स्टार सपना गिल यांच्यात भांडण झाले होते. त्यानंतर काही व्हिडिओही व्हायरल झाले, ज्यामध्ये दोघांमध्ये वाद झाल्याचे पाहायला मिळाले.

## ऑलिंपिकच्या रिंगणातून बॉक्सिंग बाहेर?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बॉक्सिंग या खेळाला बुधवारी जबरदस्त धक्का बसला. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने प्रशासनातील पारदर्शकतेचा अभाव आणि बॉक्सिंग सामन्यांचा संदर्भ व निकाल यामधील साशंकता हे कारण पुढे करीत आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग संघटनेची मान्यता काढून घेतली.

तसेच, गेल्या वर्षी आयबीएचे रशियन अध्यक्ष उमर क्रेमलेव्ह यांनी आयओसीतील कर्मचाऱ्यांबद्दल हिंसक आणि धमकावणारी भाषा वापरल्याचा आरोपही केला होता. क्रीडा लवादाने मंगळवारी आयओसीच्या निर्णयाचे समर्थन केले, त्यामुळे आता बॉक्सिंग या खेळाचे ऑलिंपिकमधील अस्तित्व धोक्यात आले आहे. २०२५पर्यंत नवीन आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग संघटना स्थापन करण्यात अपयश आल्यास २०२८मधील लॉस एंजिलिस ऑलिंपिकमधून बॉक्सिंग हा खेळ बाहेर फेकला जाणार आहे.

यावेळी आयबीएकडून महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येऊ शकते. आयओसी व क्रीडा लवादाच्या निर्णयाविरोधात ते स्वीस सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा विचार करीत आहे. तसेच, पक्षपाती निर्णय असल्याचेही त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## तीन महिन्यानंतर सुर्याची बॅट तळपणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**सूर्यकुमार यादव फिट झाल्याचे बुधवारी सर्वांसमोर आले खरे, पण तो अजूनही बंगळुरु येथे राष्ट्रीय क्रिकेट अकादमी येथे आहे. पण सूर्या मुंबई इंडियन्सच्या संघात कधी दाखल होणार, याची माहिती आता समोर आली आहे. पण सूर्या आयपीएलचा सामान लगेच खेळू शकतो का, याबाबत मात्र अजूनही स्पष्टता आलेली नाही.**



सूर्या हा दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर असताना जायबंदी झाला होता. त्यानंतर गेले तीन महिने सूर्या हा क्रिकेटपासून लांब होता. सूर्यावर शस्त्रक्रीया करण्यात आली होती. त्यानंतर सूर्या हा राष्ट्रीय क्रिकेट अकादमी येथे रवाना झाला होता. तिथे त्याला फिटनेस कमावण्यासाठी बराच वेळ लागत होता. आयपीएलला सुरुवात होण्यापूर्वी सूर्याची पहिली फिटनेस टेस्ट झाली होती. यावेळी सूर्या या फिटनेस टेस्टमध्ये नापास झाला होता. त्यामुळे सूर्या आयपीएलच्या पहिल्या सामन्यात खेळणार नाही, हे स्पष्ट झाले होते. त्यानंतर आयपीएल सुरु झाल्यावर पुन्हा एकदा सूर्याची फिटनेस टेस्ट घेण्यात आली होती. या दुसऱ्या फिटनेस टेस्टमध्येही सूर्या नापास ठरला होता. त्यामुळे सूर्या आयपीएल खेळणार की नाही, अशी चर्चा सुरु होती. पण सूर्या आता तिसऱ्या फिटनेस चाचणीत पास झाला आहे. त्यामुळे आता आयपीएलमध्ये खेळू शकतो. पण तो मुंबई इंडियन्सच्या संघात कधी दाखल होणार, हे आता समोर आले आहे.

मुंबई इंडियन्सचा पुढील सामना हा ७ एप्रिलला खेळवण्यता येणार आहे. हा सामना दिल्ली कॅपिटल्सबरोबर होणार आहे. हा सामना खेळण्यासाठी अजून तीन दिवसांचा तर अवधी नक्कीच आहे. त्यामुळे सूर्या आता या सामन्यासाठीच्या सरावात सहभागी होऊ शकतो. त्यामुळे येत्या काही दिवसांत सूर्या हा मुंबई इंडियन्सच्या टीममध्ये दिसणार आहे. पण सूर्या आता दिल्ली कॅपिटल्सचा सामान खेळू शकणार की नाही, हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे यासाठी अजून काही वेळ वाट पाहावी लागणार आहे.

## रसेलचे इशांतसमोर लोटांगण

**। कोलकत्ता । वृत्तसंस्था ।**

कोलकता नाईट रायडर्सची आयपीएलच्या यंदाच्या मोसमातील विजयाची मालिका बुधवारीही कायम राहिली. प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर कोलकता संघाने दिल्ली कॅपिटल्स संघावर १०६ धावांनी दणदणीत विजय साकारला.



या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सच्या फलंदाजांनी १८ षटकार आणि २२ चौकार मारले. पण याच सामन्यात दिल्लीचा वेगवान गोलंदाज इशांत शर्मा आयपीएलच्या हंगामातील सर्वात खतरनाक बॉल टाकला. इशांत शर्माने ३ षटकात ४३ धावा दिल्या मात्र त्याच्या एका चेंडूने खळबळ उडवून दिली. त्याने २० व्या षटकात हा चेंडू टाकला.

या सामन्यात रसेल खूपच आक्रमक दिसला. त्याने १८ चेंडूत ३ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने ४१ धावा केल्या होत्या. पण, त्यानंतर इशांतने एक चेंडू टाकला ज्याचे त्याच्याकडे उत्तर नव्हते. इशांत शर्माने रसेलला उत्कृष्ट यॉर्कर टाकले. चेंडू खेळताना रसेलही खेळपट्टीवर पडला. रसेलला इशांतचा हा बॉल इतका आवडला की, बोल्ड झाल्यानंतर त्याने त्याच्यासाठी टाळ्या वाजवल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)